cmyk

## संपादकीय

### ‘लॅटरल एन्ट्री’ च्या माघारीची नामुष्की

प्रशासकीय सेवांमध्ये मागच्या दाराने भरती करण्यासाठीची ‘लॅटरल एन्ट्री’ भरतीची जाहिरात मोदी सरकारने अचानक मागे घेतली आहे. सरकारचा हा निर्णय स्वागतार्ह असला, तरी त्याला कारणही तसेच घडले आहे. विरोधकांनी याबाबत आवाज उठवायला सुरुवात केल्यानंतर आणि त्याला सत्ताधारी एनडीएतीलच घटक पक्षांची साथ मिळू लागल्याचे लक्षात आल्यानंतर सरकारने तातडीने हे पाऊल उचलले आहे. जेमतेम चौथ्या दिवशी सरकारच्या माघारीचा हा निर्णय झाला. ही नरमाई या आधीच्या दहा वर्षांत दिसली नव्हती.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

### जम्मू–काश्मीरमध्ये काँग्रेसची नॅशनल कॉन्फरन्ससोबत आघाडी

नवी दिल्ली: जम्मू–काश्मीर विधानसभा निवडणूक काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्स पक्ष एकत्र लढवतील, अशी घोषणा राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि नॅशनल कॉन्फरन्स (एनसी) पक्षाचे अध्यक्ष फारूख अब्दुल्ला यांनी गुरूवारी (दि. २२) केली. एनसी आणि काँग्रेसची आघाडी निश्चित झाली असून, आता उमेदवारांची यादी प्रसिद्ध केली जाईल, असेही त्यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांची भेट घेतल्यानंतर स्पष्ट केले. दरम्यान, जम्मू काश्मीर विधानसभेची निवडणूक १८ सप्टेंबरपासून सुरू होणार असून तीन टप्प्यांत मतदानप्रक्रिया पार पडणार आहे. निवडणुकीचा निकाल ४ ऑक्टोबर रोजी जाहीर होणार आहे.

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१२२ | शुक्रवार दि.२३ ऑगस्ट २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

# शंभू सीमा उघडण्यावर अद्याप निर्णय नाहीच

## शेतकऱ्यांचा तळ कायम, सर्वोच्च न्यायालयात पुढील सुनावणी २ सप्टेंबरला

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**शंभू सीमा उघडण्याबाबत सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेवर गुरूवारी (दि. २२) सुनावणी झाली. यावेळी कोणताही निर्णय न आल्याने सध्यातरी शंभू सीमा बंदच राहणार आहे. तर पुढील सुनावणी २ सप्टेंबरला होणार आहे. यावेळी न्यायालयाने हरियाणा सरकारला शेतकऱ्यांशी चर्चा सुरू ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. संयुक्त किसान मोर्चा अराजकीय आणि मजूर मोर्चाने हमीभाव कायद्यासह विविध मागण्यांसाठी १३ फेब्रुवारी २०२४ पासून दिल्ली चलो आंदोलन पुकारले आहे. पण हरियाणा राज्य सरकारने आंदोलक शेतकऱ्यांना शंभू सीमेवर रोखले आहे.**



पंजाब–हरियाणा उच्च न्यायालयाने अंबालाजवळील शंभू सीमेवरील बॅरिकेड्स एका आठवड्याच्या आत हटवण्याचे आदेश दिले होते. या आदेशाविरोधात हरियाणा सरकारने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यावरून सर्वोच्च न्यायालयात सध्या सुनावणी सुरू आहे. अद्याप याबाबत कोणताच निर्णय आलेला नसल्याने १३ फेब्रुवारीपासून आंदोलक शेतकरी शंभू सीमेवर तळ ठोकून बसले आहेत. शंभू सीमा प्रकरणावर गुरूवारी न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती दीपंकर दत्ता आणि न्यायमूर्ती उज्वल भुयान यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने शंभू सीमा सध्या उघडणार नसल्याचे स्पष्ट करनाता सुनावणीची पुढील तारीख दिली. तसेच शेतकऱ्यांसोबत सुरू असलेल्या बैठका सुरू ठेवण्यासह त्यांच्या महामार्गावर असणाऱ्या ट्रॅक्टर आणि ट्रॉली हटवण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश सरकारला दिले. न्यायालयाने पंजाब सरकारला पुढील तीन दिवसात उर्वरित समिती सदस्यांसाठी नावे देण्याचे निर्देश देखील दिले आहेत. यावेळी पंजाब आणि हरियाणा सरकारने बुधवारी (दि.२१) पतियाळा येथे झालेल्या शेतकऱ्यांसोबतच्या बैठकीचा अहवाल न्यायालयात सादर केला. यावेळी न्यायालयाने सांगितले की, लवकरच शेतकऱ्यांच्या तक्रारी सोडविण्यासाठी, त्यांचे निराकरण करण्यासाठी ◀◀ पान २ वर

## राज्यात आजपासून धुवांधार!

### काही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट



**मुंबई । प्रतिनिधी**

उत्तर बांगला देशावरील कमी दाबाच्या क्षेत्रामुळे आसाम, मेघालय आणि त्रिपुरामध्ये पुढील २ दिवसांत जोरदार अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे. तसेच २४ ते २७ ऑगस्ट दरम्यान गुजरात आणि महाराष्ट्रातही जोरदार ते अतिवृष्टीची शक्यता असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे. उत्तर बांगला देशावरील कमी दाबा क्षेत्र याच प्रदेशावर कायम आहे. ते पुढील ४८ तासांत पश्चिम बंगालच्या पश्चिमेच्या दिशेला सरकण्याची शक्यता आहे. तसेच कर्नाटक– गोवा किनारपट्टीलगत पूर्व मध्य अरबी समुद्रात आणखी एका कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे. ते पुढील २४ तासांत उत्तरेकडे सरकण्याची शक्यता ◀◀ पान २ वर

# मुख्यमंत्र्यांच्या दाव्याची एसआयटी मार्फत चौकशी करा

## एकनाथ शिंदे यांच्या दोन महिन्यातील फाशीच्या शिक्षेच्या वक्तव्यावरून उद्धव ठाकरे यांची मागणी



**मुंबई । प्रतिनिधी**

**बदलापूरातील दोन चिमुकल्यावर कथित अत्याचार केल्या प्रकरणात आरोपीला वाचविण्यात शाळा प्रशासनाबरोबरच पोलिस प्रशासनाने दिरंगाई केल्याची माहिती पुढे आली. तसेच शाळेच्या विश्वस्त पदांवर सर्व सत्ताधारी पक्षाशी संबधित असल्याची माहितीही पुढे आली. त्या विरोधात बदलापूरातील रहिवाशांकडून स्वयंपूर्तीने आंदोलन करण्यात आले. या आंदोलनावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी टीका करताना आंदोलन राजकिय हेतून प्रेरित होत आणि त्यात बाहेरून आलेले लोक सहभागी होते असा आरोप केला. तसेच अशाच एका प्रकरणात दोन महिन्यापूर्वी एका आरोपीला फाशीची शिक्षा सुनावण्यात आल्याचे प्रत्युत्तर देत विरोधकांवर कढी करण्याचा प्रयत्न केला. त्यावरून विरोधकांकडून मुख्यमंत्री शिंदे यांना नाव जाहिर करण्याची मागणी करण्यात येऊ लागली आहे. तर शिवसेना उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी थेट मुख्यमंत्र्यांच्या दाव्याची एसआयटी मार्फत चौकशी करावी अशी मागणी केली आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांना बॅकफूटला जाण्याची पाळी आल्याचे दिसून येत आहे.**

शिवसेना भवनात आयोजित पत्रकार परिषदेत शिवसेना उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे बोलत होते. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, मुख्यमंत्री शिंदे यांनी दोन महिन्यापूर्वी ज्या आरोपीला फाशी दिल्याचे सांगत आहेत, त्याबद्दल माहिती बाहेर काढण्यासाठी एक वेगळी एसआयटी स्थापन करावी अशी मागणी करत जर जलदगती न्यायालय स्थापन करून जर आरोपीला फाशी दिली असेल तर राज्यातील जनतेला त्याची ◀◀ पान २ वर

### तर सत्ताधारीही विकृतच...

मुख्यमंत्री शिंदे यांच्या वक्तव्याचा समाचार घेताना उद्धव ठाकरे म्हणाले की, बदलापूर येथे आंदोलन करणारे जर राजकिय असतील तर त्यात गैर काय असा सवाल उपस्थित करत जर हे लोक रस्त्यावर उतरले नसते तर गुन्हाही दाखल नसता. सुषमा अंधारे यांनी वामन म्हात्रेच्या विरोधात आंदोलन केल्यानंतर त्याच्या विरोधात गुन्हा दाखल झाला. हे आंदोलन केले नसते तर तो सुटलाच असता असे सांगत आंदोलक जर राजकिय वाटत असतील तर सत्ताधारी तितकेच विकृत आहेत अशी टीकाही यावेळी केली.

### मुख्यमंत्र्यांनी दिलेला पुरावा दोन वर्षापुर्वीचा?

विरोधकांच्या टीकेवरून कोल्हापूरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, काही महिन्यांपूर्वी अशाच एका प्रकरणात आरोपीला फाशीची शिक्षा दिल्याचे मी म्हणालो. त्यावरून विरोधकांनी एकच गोंधळ घातला. आज माझ्या हातात त्या प्रकरणातील न्यायालयाच्या निकालाची प्रत असून हे प्रकरण मावळ तालुक्यातील आहे. २०२४ एप्रिल–मे महिन्यात तेजस दळवी यास या प्रकरणात सत्र न्यायालयाने फाशीची शिक्षा दिली आहे. त्याचे निकाल पत्र माझ्या हातात असल्याचे यावेळी सांगत निकाल पत्र उपस्थित जनसमुदायाला त्यांनी दाखविले. दरम्यान, मुख्यमंत्री शिंदे यांनी दाखवलेला कोर्टाचा निकाल हा २०२४ मधील नसून तो दोन वर्षापूर्वीचा फाशीचा निकाल असल्याची माहिती पुढे येत आहे. त्यामुळे मुख्यमंत्री शिंदे यांनी दाखविलेल्या निकाल पत्राबाबतही आता विरोधकांकडून शंका उपस्थित करण्यात येत आहे.

### लाचखोर सेवा सहकारी संस्थेचा सचिव जाळ्यात

**परळी:** एक लाखाची लाच घेताना बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मंडळ अधिकारी सचिन सानप रंगेहाथ पकडला. या घटनेला २४ तासाचाही कालावधी उलटला नाही तोच गुरुवारी (दि.२२) परळीमध्ये लाचखोर पकडला आहे. सलग दोन दिवस लाचखोरांवर कारवाई केल्याने जिल्ह्यातील लाचखोरी पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली आहे. सेवा सहकारी संस्था वानटाकळी परळी सचिव बी.डी शिंगे व पवार असे लाचखोराचे नाव आहे. या प्रकरणी परळी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या कारवाईने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. ही कारवाई उस्मानाबाद एसीबीने केली आहे.

# पृथ्वीराज चव्हाण यांनी घेतली मनोज जरांगे यांची भेट

## राजकिय तर्क वितर्काला सुरूवात



**जालना । प्रतिनिधी**

राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे वरिष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी गुरूवारी अंतरवाली सराटीत जाऊन मनोज जरांगे यांची भेट घेतली. या भेटीत नेमकी काय चर्चा झाली, यावरुन तर्क वितर्क सुरू आहेत.

मनोज जरांगे यांनी विधानसभा निवडणुकांसाठी रणनिती आखायला सुरुवात केली असून, विधानसभेत उमेदवारच उभा करणार असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. विशेष म्हणजे २९ ऑगस्ट रोजी ते यासंदर्भातील निर्णयही जाहीर करणार होते, ◀◀ पान २ वर

# सर्वाधीक शेतकरी आत्महत्या बीड जिल्ह्यात त्यावर केंद्रीय कृषिमंत्री का बोलले नाही ?

## अंबादास दानवे यांची खोचक टीका

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

शिवराज सिंग चौहान जी, आपण आणि आपल्या बरोबर राज्यातील जे मंत्री बीड जिल्ह्यात उपस्थित होते त्याच बीड जिल्ह्यात मराठवाड्यातील सर्वाधिक शेतकरी आत्महत्या होतात. मात्र त्याबद्दल आपल्यासह कोणीही चकार शब्द देखील काढला नाही.



आपले यावर भाष्य न करणे म्हणजे केंद्र आणि राज्य सरकार शेतकरी आत्महत्यांबाबत फक्त संवेदनशील असल्याचा आव आणत असल्याचेच उघड होत असल्याची टीका अंबादास दानवे यांनी केली आहे.

केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान बुधवारी (ता.२१) ◀◀ पान २ वर

# बदलापूर प्रकरणी उज्वल निकम यांची नियुक्ती रद्द करा

## वंचित बहुजन आघाडीची मागणी

मुंबई । प्रतिनिधी

बदलापूर प्रकरणात राज्य सरकारने केलेली ॲड.उज्वल निकम यांची नियुक्ती रद्द करण्यात यावी अशी मागणी वंचित बहुजन आघाडीने केली. संबंधित शाळेचे संचालक मंडळ भारतीय जनता पक्षाशी व आरएसएसशी संबंधित आहे. त्यामुळेच हे प्रकरण हाताळताना राजकीय हस्तक्षेप होऊ शकेल अशी रास्त ◀◀ पान २ वर



# सार्वजनिक उद्रेक झाल्याशिवाय पोलीस कामच करत नाहीत!

## हायकोर्टाने पोलीस आणि सरकारलाही झापले

**मुंबई । प्रतिनिधी**

सार्वजनिक उद्रेक झाल्याशिवाय पोलीस कामच करत नाहीत, अशा शब्दांत हायकोर्टानं पोलीस यंत्रणेला फटकारले. ही महत्वाच्या मुद्द्यावरील कोर्टानं स्व:हून दाखल केलेली जनहित याचिका असल्याने मुलींच्या सुरक्षिततेशी तडजोड करता येणार नाही. जोपर्यंत तीव्र जनक्षोभ, निषेध आंदोलन होत नाही तोपर्यंत यंत्रणा काम करत नाही, असे खंडपीठाने म्हटले आहे.

बदलापूर इथे शाळेतच दोन चिमुकलींचे लैंगिक शोषण झाल्याप्रकरणाची मुंबई हायकोर्टाने स्वतःहून दखल घेतली आहे. या प्रकरणावर हायकोर्टात सुनावणी झाली. यावेळी पोलिसांना कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी फटकारले



पीडित व त्यांच्या कुटुंबीयांचे जबाब प्रक्रियेनुसार वेळेवर का नोंदवले गेले नाहीत? तसेच शाळा प्रशासनावर तातडीने कारवाई का झाली नाही? असा सवाल ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२२ ऑगस्ट २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ४.०० क्विंटल | २,६९८ | २,६९८ | २,६९८ |
| ज्वारी/हायब्रिड :८९.०० क्विंटल | १,९०० | ६,६७० | २,३४३ |
| मूग :२१.५० क्विंटल | ६,५०० | ७,३०० | ६,८९६ |
| तूर : १७.५० क्विंटल | ९,९३१ | ९,९३१ | ९,९३१ |
| उडीद : २.५० क्विंटल | ४,९०१ | ७,४०० | ६,१५० |
| बाजरी: ३९.०० क्विंटल | २,३१० | २,८०० | २,५४९ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: ४४.०० क्विंटल | ४,००० | ४,१५० | ४,१०५ |
| हरभरा: २.०० क्विंटल | ६,००० | ६,७१० | ६,३५५ |

# अखेर एमपीएससी परीक्षा पुढे ढकलली!

## विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला यश, शरद पवार यांनी दिला होता आंदोलनात उतरण्याचा इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा आणि आयबीपीएस परीक्षा एकाच दिवशी येण्यासह कृषी सेवेतील पदांचा समावेश न झाल्याने स्पर्धा परिक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी मंगळवार (ता.२०) पासून आंदोलन सुरू केले होते. विद्यार्थ्यांच्या या आंदोलनाला अखेर यश आले असून आयोगाने महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा –२०२४ पुढे ढकलण्याचा निर्णय गुरूवारी (दि.२२) घेतला. यामुळे पुण्यात आंदोलनास बसलेल्या विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र कृषी सेवेतील पदांचा समावेश करण्यात न आल्याने**



**अद्यापही विद्यार्थ्यांमध्ये रोष दिसत आहे.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा आणि आयबीपीएस परीक्षा रविवारी (दि.२५) आयोजित होती. आयबीपीएस परीक्षा केंद्राची असल्याने त्याची तारीख बदलणे शक्य नाही. पण महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षेची तारीख बदलणे शक्य होते. त्यासंदर्भात याआधीच स्पर्धा परिक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी केली होती. तसेच महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षेत कृषी सेवेतील २५८ पदांचा समावेश करावा अशी मागणी केली होती. मात्र विद्यार्थ्यांच्या या मागणीकडे आयोगासह ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# ‘लॅटरल एन्ट्री’ च्या माघारीची नामुष्की

प्रशासकीय सेवांमध्ये मागच्या दाराने भरती करण्यासाठीची ‘लॅटरल एन्ट्री’ भरतीची जाहिरात मोदी सरकारने अचानक मागे घेतली आहे. सरकारचा हा निर्णय स्वागतार्ह असला, तरी त्याला कारणही तसेच घडले आहे. विरोधकांनी याबाबत आवाज उठवायला सुरुवात केल्यानंतर आणि त्याला सत्ताधारी एनडीएतीलच घटक पक्षांची साथ मिळू लागल्याचे लक्षात आल्यानंतर सरकारने तातडीने हे पाऊल उचलले आहे. जेमतेम चौथ्या दिवशी सरकारच्या माघारीचा हा निर्णय झाला. ही नरमाई या आधीच्या दहा वर्षांत दिसली नव्हती. उलट एखाद्या मागणीसाठी आंदोलन सुरू झाले की त्याकडे साफ दुर्लक्ष करायचे आणि ती मागणीच मान्य करायची नाही, की त्या प्रकरणात लक्षच घालायचे नाही हाच खाक्या या सरकारचा राहिला आहे. मग तो विषय शेतकरी आंदोलनाचा असो, धगधगत्या मणिपूरचा असो की ब्रिजभूषण शरणसिंह याने महिला कुस्तीपटूंचे केलेले लैंगिक शोषणाचे प्रकरण असो, सरकारने कोणत्याच प्रकरणातील मागणीला धूप घातली नव्हती. पण मोदी सरकारच्या या तिसऱ्या आवृत्तीत हा जो बदल झाला आहे तो स्वागतार्ह आहे.

मोदी सरकारला स्वबळावर न मिळालेल्या बहुमताचा हा आविष्कार आहे, असा निष्कर्ष कोणीही सहज काढू शकतो. ‘लॅटरल एन्ट्री’द्वारे थेट प्रशासकीय सेवेत ४५ वरिष्ठ अधिकार्यांची भरती होणार होती. ही बाब प्रथम काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी उचलून धरली. सोशल मीडियावर त्यांनी यावर जोरदार टीका केली. दुसऱ्या दिवशी विरोधी पक्षनेते राहुल गांधींनी हा विषय उचलून धरल्यानंतर समाजवादी पार्टी आणि बहुजन समाज पार्टी तसेच नंतरच्या टप्प्यात द्रमुक या विरोधी आघाडीतल्या पक्षनेत्यांनी त्यावर आवाज उठवला. पण सरकार तरीही हलले नव्हते. पण त्यांना सत्ताधारी एनडीए मधल्याच लोकजनशक्ती आणि जेडीयू या पक्षांची साथ मिळाली. या पक्षांनी सरकारच्या या निर्णयाला विरोध दर्शवल्यानंतर काही तासांत चक्रे फिरली आणि ही भरती जाहिरात मागे घेण्याचा निर्णय सरकारला घ्यावा लागला. सरकारच्या या नरमाईच्या भूमिकेचे निसंकोचपणे स्वागतच व्हायला हवे. पण त्याचे श्रेयही पुन्हा मोदींच्याच सामाजिक न्यायाच्याच भूमिकेला देण्यासाठी त्यांच्या सरकारमधील मंत्र्यांनी जो आटापिटा चालवला आहे, तो मात्र हास्यास्पद ठरला आहे. मोदी सरकारमधील काही मंत्री या ‘लॅटरल एन्ट्री’ प्रकरणाचे समर्थन करताना दिसत होते. अगदी मनमोहन सिंग सरकारच्या काळातच हा निर्णय झाला होता असे ते सांगत होते. उलट या योजनेत मोदी सरकारने पारदर्शीपणाच आणला आहे, असा त्यांचा दावा होता. या निर्णयाचे समर्थन ज्या अश्विनी वैष्णव आणि अर्जुन मेघवाल यांच्यासारख्या मंत्र्यांनी केले त्याच मंत्र्यांनी हा निर्णय मागे घेण्याच्या मोदी सरकारच्या निर्णयाचेही तितक्याच ताकदीने समर्थन केले आहे. ही योजना रद्द करणे ही मोदी यांच्या सामाजिक न्यायाच्या भूमिकेशी असलेले त्यांची कमिटमेंटच दर्शवते, असेही सांगायला त्यांनी कमी केलेले नाही. एकाच योजनेचे वर्णन पारदर्शी आणि नंतर ती मागे घेतल्यानंतर लगेच ती सामाजिक न्यायाशी असलेली वचनबद्धता कशी ठरते हे समजायला मार्ग नाही. पण सरकारमधील लोकांच्या या ढोंगावर जयराम रमेश यांच्या सारख्यांनी लगेचच बोट न ठेवले नसते तरच नवल. रमेश यांनी तर अश्विनी वैष्णव यांचे ‘एक्स’वरचे रविवारचे निवेदन आणि मंगळवारचे निवेदन एकाच वेळी पुन्हा शेअर करून हा दुटप्पीपणा नेमकेपणाने समोर आणला आहे.

‘लॅटरल एन्ट्री’द्वारे केली जाणारी भरती हा यूपीएससीचा पर्याय टाळून केली जाणारी थेट स्वरूपाची भरती होतीच; पण त्यात आरक्षणालाही पद्धतशीर फाटा देण्यात आला होता. हाच मुद्दा सगळ्यांनी जोर लावून धरला होता. सरकार संविधान आणि आरक्षणाच्या विरोधात आहे आणि ते त्यांना हाणून पाडायचे आहे, असा प्रचार विरोधकांनी सुरुवातीच्या काळापासूनच सुरू केला असून त्यांच्या या आरोपाला अशा निर्णयामुळे बळच मिळणार आहे याचा विचार सरकारने केला नाही. किंबहुना ही भरती आरक्षण विरोधी नाही हे त्यांना नीटपणे पटवून देता आले नाही.

त्यामुळे सरकारवर ही माघारीची नामुष्की ओढावली.

या आधी कोणताही निर्णय मोदी सरकार स्वबळाच्या बहुमताच्या आधारे सहज रेटून नेत असे. भाजपला बहुमत असतानाही त्यांच्या बरोबर एनडीएचे घटक पक्ष होतेच; पण त्यांची त्यांनी कधीच फिकीर केलेली दिसली नव्हती. लोकशाही प्रक्रियेत विरोधाच्या मुद्द्यांचाही विचार करायचा असतो, आक्षेपांचे निराकरण करायचे असते या कार्यपद्धतीचाच मोदी सरकारला विसर पडल्यासारखे झाले होते. पण आज परिस्थिती पूर्ण बदलली आहे. जो निर्णय लोकांच्या पचनी पडणारा नाही तो त्यांना आता एकतर्फी पद्धतीने रेटून नेता येणार नाही ही बाब लोकशाहीच्या दृष्टीने चांगलीच आहे. सांगण्याचा मुद्दा एवढाच की ‘लॅटरल एन्ट्री’ मागे घेण्याचा निर्णय मोदी सरकारने घेऊन नरमाईची भूमिका घेतली असली, तरी आता यापुढे जनहिताचा सारासार विचार करून त्यांना पावले टाकावी लागतील. लोकशाहीत मनमानी किंवा एकाधिकारशाहीला थारा नसतो किंवा तशा प्रवृत्तीने राज्य करायचे नसते एवढा धडा जरी केंद्र सरकारने घेतला तरी ते पुरेसे आहे.




## रामदास बारगजे यांना महाराष्ट्र आयकॉन पुरस्कार

**जालना । प्रतिनिधी**

**लाईफ ब्ल्यू इंडिया नॅशनल लेव्हल या नामांकित संस्थेने बारगजे नाना यांची फळबाग लागवड सेंद्रिय शेती विहीर पुनर्भरण शेतमाल मूल्यवर्धन प्रक्रिया कृषी उद्योग उत्कृष्ट या कामाची दखल घेऊन.महाराष्ट्र आयकॉन अवॉर्ड २०२४ ने सन्मानित करण्यात आले आहे.**

यावेळी महाराष्ट्र शासन कृषी विभागीय उपसंचालक श्री जगदीश पाटील व ऍग्रो केअर ग्रुपचे चेअरमन भूषण निकम संस्थेचे चेअरमन ललित जोशी हे उपस्थित होते. शिवसेना जनसंपर्क कार्यालय बदनापूर येथे श्री रामदास नाना बारगजे यांचा सत्कार करताना शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, विधानसभा संघटक कैलास दुधानी ,युवा सेना तालुकाप्रमुख ईश्वर झुंबड,उपतालुकाप्रमुख हरिभाऊ कापसे, दीपक डीघे,मनोज शिंदे,युवा सेना शहर प्रमुख कैलास खैरे, युवा सेना शहर संघटक अमोल दाभाडे, विलास खैरे ,रामेश्वर दराडे ,विलास वैद्य ,कैलास वैद्य यांची उपस्थिती होती.

## पुनःर्विवाहसाठी १६६ वधु-वरांनी केली नोंदणी-हस्तीमल बंब

**जालना । प्रतिनिधी**

सकल राजस्थानी मारवाडी समाजाच्या (जैन, अग्रवाल, माहेश्वरी, ब्राह्मण इ.) पुनःर्विवाह इच्छुक दिन दुःखी, विधवा - विधुर, अपंग, घटस्फोटितांच्या राज्यस्तरीय मेळावा रविवारी २५ अगस्त रोजी, जैन भवन, सकलेचा नगर, जालना येथे प्रथमच होत आहे. सम्मेलनाच्या आयोजन - नियोजनसाठी समितीची बैठक सुभाष देविदान यांच्या कार्यालयात दि. २१ अगस्त रोजी घेण्यात आली. प्रास्ताविक भाषण करताना हस्तीमलजी बंब म्हणाले मागील ३ महिण्या पासून राज्यस्तरीय प्रचार-प्रसार, संपर्क दौरे करून प्रत्येक जिल्ह्यात समाजाची बैठका घेऊन नोंदणी अर्ज, प्रचार सामुग्री वितरण करण्यात आली. संपूर्ण महाराष्ट्रातून व पर राज्यातून फार मोठ्या प्रमाणावर पुनःर्विवाह इच्छुक उमेद्वारांची संपूर्ण माहिती सह प्रवेश अर्ज कार्यालयात प्राप्त झाले आहे. सर्व अर्जाची छाननी करून पुनःर्विवाहसाठी १६६ वधु-वरांची नोंदणी निश्चित करण्यात आली आहे. उमेद्वारां सोबत कुटुंबाचे पालक व समाजाचे मान्यवर संपूर्ण राज्यातून मेळाव्यात सहभागी होणार आहे. त्यांच्या आवास-निवाससाठी समाजाचे भवनात प्रमुख पाहुण्याची व्यवस्था करण्यात येत आहे.




तसेच जेवण व्यवस्था, संचालन, साक्षात्कार, वस्तु भंडार, साऊंड व्यवस्था, निर्देशिका प्रकाशन, संपूर्ण महाराष्ट्रात संपर्क फोन इ. कमिटीयात तरुण, महिला सर्वांना समाविष्ट करण्यात आले आहे, असे बंब म्हणाले. कांतीलाल राठी मार्गदर्शन करताना मागील २५ वर्षाचा अनुभव संपुर्ण राज्यातून उमेद्वारांचे नोंदणी फार्म पडताळून उमेदवारांची संपुर्ण माहितीची पुस्तक दिशा-निर्देशिका प्रकाशित करण्यासाठी जोमाने तयारी करण्यात आली आहे, जनरल सम्मेलन पेक्षा पुनःर्विवाहचा सम्मेलन घेणे फार अवघड आहे, पण अति आवश्यक व महत्वपुर्ण आहे, असे राठी म्हणाले. सुभाष देविदान मार्गदर्शन करताना सकल राजस्थानी समाजाच्या पुनःर्विवाहसाठी सम्मेलन प्रथमच जालन्यात राज्यस्तरीय भव्य होत आहे व सर्व समाजाचे उमेद्वार एकाच छताखाली, एकाच मंचावर येणार आहे. समाजाला संघटीत करणे, एकजुट करणे ह्यासाठी हे एक सुध्दा माध्यम आहे, राजस्थानी समाजाच्या उमेद्वारांचा प्रथमच सर्वात मोठा सम्मेलन होणार असे देविदान म्हणाले. चर्चा सत्रात पुरुषोत्तम जयपुरिया, सतिष पंच, सुरेश उपाध्याय, संतोष करवा, ताराचंद मालपाणी, सौ. विजया बोरा आदिनी भाग घेतला. बैठकीचे सुत्र संचालन सुनिल बियाणी यांनी केले तर आभार ॲड. अभय सेठिया यांनी मांडले. शेवटी निर्देशिकाच्या मुखपृष्ठाचे विमोचन करण्यात आले.

## डॉ.ए.बी.देशपांडे यांचे निधन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहरातील सुप्रसिद्ध ज्येष्ठ फिजिशियन डॉ. ए.बी.देशपांडे यांचे २२ ऑगस्ट गुरुवारी सकाळी दुःखद निधन झाले मृत्यू समयी त्यांचे वय ८३ वर्षे होते. डॉ.अरविंद भगवंतराव (ए.बी.) देशपांडे हे वरिष्ठ चेस्ट फिजिशियन आणि सेवानिवृत्त वैद्यकीय अधीक्षक होते. ते बराच काळ महाराष्ट्र राज्याच्या आरोग्य सेवांमध्ये होते आणि त्यांना शहरी आणि ग्रामीण आरोग्य वितरण प्रणालीच्या संपर्कात राहण्याची संधी मिळाली. ते ’समाज ज्योत’ आणि ’समाज भूषण’ पुरस्कारांचे प्राप्तकर्तेही होते जिल्हा क्षयरोग नियंत्रण संस्थेत त्यांनी मोठे काम केले. त्यांनी आरोग्य विषयाशी निगडीत चार पुस्तके लिहिली. तसेच राज्य आणि प्रादेशिक परिषदांमध्ये मोठया प्रमाणावर वैज्ञानिक शोधनिबंध सादर केले.



त्यांना कर्नाटकातील बागलकोट वैद्यकीय महाविद्यालयात छातीच्या आजारांचे सहयोगी प्राध्यापक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. भारतातील क्षयरोग नियंत्रण शक्यता आणि आव्हाने. या विषयावर त्यांनी विशेष संशोधन केले. ए.बी.देशपांडे हे औषध आणि छातीचे आजार या क्षेत्रातील एक प्रसिद्ध नाव होते. त्यांनी रुग्णसेवेशी समर्पित होऊन काम केले त्यांनी दुर्गम भागात वेगवेगळ्या प्राथमिक आरोग्य सेवा केंद्रात काम केले जेथे सुविधा, सामान्य रोगांचे निदान करण्यासाठी साधने नव्हती. त्यांचा क्लिनिकल अनुभव, चांगले संवाद कौशल्य, योग्य निदान यामुळे त्यांनी रुग्णांवर योग्य तऱ्हेने उपचार केले रुग्ण सेवेशी समर्पित व्यक्तिमत्व लोप पावल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात उपप्राचार्य प्रा.डॉ.जितेंद्र,न्यायमुर्ती गिरीष ही दोन मुले,सुना,नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार २३ ऑगस्ट रोजी सकाळी बोरुळ तलाव स्मशानभूमीत होणार आहेत.

## भरधाव कारने घरासमोर बसलेल्या तिघांना उडवत १०० फूट फरफटत नेले; दोघांचा मृत्यू

**जालना । प्रतिनिधी**

**भोकरदन- अन्वा रोडवर वाडी शिवारातील गणपती मंदिराजवळ भरधाव कारने घरासमोर बसलेल्या तिघांना चिरडल्याची घटना २२ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजेच्या सुमारास घडली. यामध्ये दोघांचा जागीच मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी आहे. शंकर सिताराम चोरमारे, वय ३५,ज्ञानेश्वर विठ्ठल शिंदे वय २८ अशी मृतांची नावे आहेत. तर लक्ष्मण चव्हाण हे जखमी झाले आहेत.**



२२ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजेच्या दरम्यान शंकर सिताराम चोरमारे, ज्ञानेश्वर विठ्ठल शिंदे आणि लक्ष्मण चव्हाण हे तिघे जण भोकरदन- अन्वा रोडवर वाडी शिवारातील घरासमोर बसले होते. याच दरम्यान अन्वा गावाकडून भोकरदनकडे भरधाव वेगाने आलेल्या कारने ( क्रमांक एम एच ४० सी एक्स १३५०) घरासमोर बसलेल्या तिघांच्या अंगावर गाडी घातली. गाडीने जवळपास १०० फूट त्यांना फरफटत नेले. या भीषण अपघातात शंकर चोरमारे यांचा जागीच मृत्यू झाला. तर गंभीर जखमी अवस्थेत उपचासाठी छत्रपती संभाजीनगर येथे नेत असताना रस्त्यामध्ये ज्ञानेश्वर शिंदे यांचा मृत्यू झाला. तर तिसरे गंभीर जखमी लक्ष्मण चव्हाण यांच्यावर भोकरदन ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करून पुढील उपचासाठी छत्रपती संभाजीनगर येथे रवाना करण्यात आले. याबाबत भोकरदन पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू होती. चालकास डुलकी लागल्याची शक्यता सदरील कार एका कंपनीच्या ताफ्यातील असून जायकुमार शरद देशभ्रतार असे चालकाचे नाव आहे. कार जळगाव येथून लातूरकडे दोघांना घेऊन मधल्या मार्गे जात होती. अपघातानंतर चालकाने कार जागेवर उभी केली. सध्या चालक पोलिसांच्या ताब्यात आहे.

## ग्रंथमित्र पुरस्काराने गणेश शेंडगे सपत्नीक सन्मानित

**मुंबई । प्रतीनिधी**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय, ग्रंथालय संचालनालय, मुंबई यांच्या वतीने डॉ.शि. रा.रंगनाथन ग्रंथालय कार्यकर्ता ग्रंथमित्र विभागस्तरीय सन २०२२ - २३ चा पुरस्कार ग्रंथ मित्र गणेश शेंडगे यांना सपत्नीक उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा.ना.चंद्रकांत दादा पाटील यांच्या शुभहस्ते दि.२० ऑगस्ट २०२४ रोजी महिला विद्यापीठ एस. एन.डी.टी मुंबई येथे संपन्न झाला. पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, मानपत्र व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यातकेले. यावेळी व्यासपीठावर उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव मा.विकासचंद्र रस्तोगी, उपसचिव मा.लुबाळ साहेब, राज्यसभेचे माजी खासदार, लेखक,पत्रकार कुमार केतकर, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष मा.डॉ.गजानन कोटेवार, ग्रंथालय संचालक मा.अशोक गाडेकर, ग्रंथालय संचालनालयातील सर्व अधिकारी, सर्व जिल्ह्याचे जिल्हा ग्रंथालय अधिकारी, सर्व विभागाचे पदाधिकारी, ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते, मराठवाडा विभाग ग्रंथालय संघ अध्यक्ष श्री.राम मेकले,जिल्हा ग्रंथालय संघाचे बीड जिल्हा ग्रंथालय संघाचे पवन गिरवलकर धम्मपाल वैद्य चौधरी यांच्यासह मोठ्या संख्येने बीड जिल्ह्यातून ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते उपस्थित होते. सदरील पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी त्यांच्या आई बंधू प्रोफेसर डॉक्टर सुधाकर शेंडगे वहिनी मुलं गुरुप्रसाद आणि उत्कर्ष आदींची ही उपस्थिती होती.



## राष्ट्रीय संत श्री भगवान बाबा यांच्या १२८ व्या जयंती उत्सवाचे आयोजन

### शनिवारी ह.भ.प.मोहन महाराज खरमाटे याचे कीर्तन






**बीड प्रतिनिधी**

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे किस्किंदा कांड भावार्थरामायण सांगता व श्री संत भगवान बाबा यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त किर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक-०६/०८/२०२४ ते २३/०८/२०२४ या काळात किस्किंदाकांडाचे वाचक व सुचक श्री ह.भ.प.मोहन महाराज खरमाटे, कचरू महाराज चव्हाण, उत्तम महाराज दोडके, आश्रुबा महाराज सानप, दत्तात्रय महाराज बांगर,घोलप आण्णा,आश्रूबा महाराज सानप, हे होते. यावर्षी दिनांक- २४/०८/२०२४ श्रावण वद्य पंचमी शनिवार या दिवशी राष्ट्रसंत श्री भगवान बाबा यांच्या१२८ व्या जन्मोत्सवा निमित्त सकाळी पुजा आरती होईल. नंतर ह.भ.प.मोहन महाराज खरमाटे यांचे किर्तन सकाळी ११-०१ वाजता होईल.व नंतर महाप्रसाद असा कार्यक्रम आयोजित केला आहे. या सर्व कार्यक्रमाचा लाभ समस्त भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन डॉ.राजेंद्र भाऊ सानप अध्यक्ष भाऊ- बाबा प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉंलनी नगर रोड बीड यांनी केले आहे

## पान १वरून...

### शंभू सीमा उघडण्यावर

बहुसदस्यीय समिती स्थापन केली जाईल. यावेळी पंजाब सरकारने न्यायालयाला सांगितले की, १२ ऑगस्टला न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे सरकारने आंदोलक शेतकऱ्यांसोबत बैठक घेतली. ज्यामध्ये सरकारने बंद केलेला महामार्ग अंशतः उघडण्यास सहमती दर्शवली होती. मागील सुनावणी वेळी न्यायालयाने या प्रकरणी कठोर शब्दात पंजाब सरकारला धारेवर धरले होते. तर ‘महामार्ग पार्किंगची जागा नाही’, असे सुनावले होते. तसेच १३ फेब्रुवारीपासून शंभू सीमेवर आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांचे ट्रॅक्टर आणि ट्रॉली रस्त्यावरून बाजूला घेण्यासाठी तयार करा असेही म्हटले होते.

-----------

### मुख्यमंत्र्यांच्या दाव्याची एसआयटी

माहिती मिळणे आवश्यक आहे, तसेच ती माहिती जनतेसमोर आली पाहिजे अशी मागणी यावेळी केली. उद्धव ठाकरे पुढे बोलताना म्हणाले की, क्षमता नसलेला माणूस मुख्यमंत्री पदावर विराजमान आहे. त्यांना फक्त जनतेच्या भावनांशी खेळता येते. ही व्यक्ती गद्दार आहे. जनतेच्या भावनांशी गद्दारी केली असून हे दुर्दैवी आहे, अशी टीका त्यांनी केली. उद्धव ठाकरे पुढे बोलताना म्हणाले की, कोलकाता येथील घटनेनंतर सातत्याने अशा घटना घडत असल्याचे दिसून येत आहेत. अशा घटना जेव्हा लागोपाठ घडतात तेव्हा जनप्रक्षोभाचा उद्रेक घडतो. या जनक्षोभात कोणत्याही राजकिय पक्षाचा सहभागाचा हात नसतो. महाराष्ट्रात अशा विकृतांना कठोर शिक्षा व्हावी यासाठी २४ ऑगस्टचा भारत बंद पुकारण्यात आला आहे. त्यात सहभागी व्हावे असे आवाहनही यावेळी केले.

------

### राज्यात आजपासून धुवांधार!

असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे. यामुळे या आठवड्यात कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात सर्वदूर पाऊस राहील. विशेषतः कोकण आणि गोव्यातील काही भागांत पुढील ७ दिवसांत जोरदार पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात २३ ते २६ ऑगस्ट दरम्यान, विदर्भ आणि मराठवाड्यात २४ ते २५ ऑगस्ट दरम्यान जोरदार पाऊस राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

**या जिल्ह्यांना अलर्ट जारी**

मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राने पालघर, मुंबई, रत्नागिरी आणि सिंधुदुर्गसाठी २४ ते २६ ऑगस्ट दरम्यान जोरदार पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे. रायगड जिल्ह्यात २३ ते २५ ऑगस्ट दरम्यान मुसळधार पावसाची शक्यता असल्याने ऑरेंज अलर्ट दिला आहे. ठाणे जिल्ह्यात २३ ते२४ ऑगस्ट दरम्यान यलो अलर्ट तर २५ ऑगस्ट रोजी ऑरेंज अलर्ट राहील. पुणे जिल्ह्याला २४ आणि २५ ऑगस्ट रोजी मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला आहे. चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया जिल्ह्याला २४ ऑगस्ट रोजी ऑरेंज अलर्ट दिला आहे.

-----------

### सर्वाधीक शेतकरी आत्महत्या बीड जिल्ह्यात

मराठवाड्याच्या दौऱ्यावर होते. राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या परळी विधानसभा मतदारसंघात आयोजित राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी सहा कलमी धोरण आखल्याचे सांगितले. तसेच काँग्रेसह जेष्ठ नेते शरद पवार यांच्यावर टीका केली. यावरून शिवसेना नेते तथा विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी शिवराज सिंह चौहान यांच्यासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यावर निशाना साधत टीका केली. अंबादास दानवे यांनी यावरून खोचक ट्विट करताना, शिवराज सिंह चौहान जी काल ज्या बीड जिल्ह्यात होतात तिथे मराठवाड्यातील सर्वाधिक शेतकरी आत्महत्या करत आहे. त्यावर का बोलले नाहीत? किंवा जे उपस्थित मंत्री होते त्यांच्यातील कोणी चकार शब्दही का काढला नाही, असा सवाल केला आहे. यावरून आता पुन्हा राजकीय वार पलटवार सुरू झाले आहेत. अंबादास दानवे यांनी, परळीत कृषी प्रदर्शनाच्या निमित्ताने सगळ्या वक्त्यांची भाषणे फक्त कांदा, सोयाबीन, कापूस, युरिया, डीएपी, हमीभाव, ड्रोन, नॅनो युरिया, याबाबतच्या अडचणींच्या कथनावर झाली. त्यामुळे राज्यातील नेत्यांसह आपल्याला देखीव महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे प्रश्न माहित आहेत. किमान यानिमित्ताने राज्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न आपल्याला जाणवायला तरी लागलेत असे म्हटले आहे. मात्र केंद्रीय कृषी मंत्र्यांनी आल्यासरशी यातील एकही प्रश्न सोडवला नाही अशी खोचक टीकाही अंबादास दानवे यांनी केली आहे.

-----------

### पृथ्वीराज चव्हाण यांनी

मात्र विधानसभा निवडणुका लढवण्या संदर्भातील घोषणेची तारीख त्यांनी पुढे ढकलली आहे. त्यामुळे, जरांगे खरेच निवडणूक लढवणार आहेत की, गत निवडणुकांप्रमाणे कोणाला तरी पाडा म्हणून निवडणुकीच्या मैदानात उतरणार आहेत, याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. त्यातच, गुरूवारी पृथ्वीराज चव्हाण यांनी अंतरावाली सराटीमध्ये जाऊन मनोज जरांगे यांची भेट घेतली. या भेटीत मराठा आरक्षण व विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने चर्चा झाल्याची माहिती आहे. पृथ्वीराज चव्हाण हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहिले आहेत, तसेच मराठा आरक्षणासंदर्भाने त्यांनीही त्यांच्या कार्यकाळात काम केल्यामुळे या भेटीत आरक्षणावरच चर्चा झाल्याचे समजते. मात्र, निवडणुकांपूर्वी किंवा मनोज जरांगे यांच्या निवडणूक लढवण्याच्या घोषणेपूर्वी चव्हाण यांनी जरांगेंची भेट घेतल्याने राजकीय उलथापालथ तर होणार नाही ना, याचीही चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे.

**जरागेंनी २९ ऑगस्टची बैठक पुढे ढकलली**

निवडणुकांबाबत आपली रणनीती सुरू असून २९ ऑगस्टला आपण काय भूमिका घेतो हे सरकारला पाहायचे आहे. त्यांनी निवडणुका लांबवल्यामुळे आपल्याला २९ ऑगस्टची बैठक पुढे ढकलावी लागेल. यावेळेस जे होईल ते होईल,आपली रणनीती डाव प्रतिडाव कळू नयेत. निवडणुकीची घोषणा होण्याअगोदर आपण बैठक ठरवू. आपले डाव सरकारला का कळू द्यायचे? सर्वांना मराठा समाजाला सांगायचे, त्यांची निवडणूक तारीख जाहीर होईल तेव्हा बैठक घेऊ, असे मनोज जरांगे यांनी स्पष्ट केले.

-------------

### बदलापूर प्रकरणी उज्ज्वल

भिती लोकांना वाटत आहे. भाजपाचे लोकसभेचे उमेदवार ॲड. उज्ज्वल निकम यांची सरकारी वकिल म्हणून झालेली नियुक्ती साशंकता निर्माण करणारी आहे असल्याचे मतही वंचितच्या प्रदेशाध्यक्षा रेखा ठाकूर यांनी केली. रेखा ठाकूर पुढे बोलताना म्हणाल्या की, बदलापूर येथील आदर्श विद्यालयात दोन बालिकांवर झालेल्या लैंगिक अत्याचाराची घटना संतापजनक आहे. शाळेच्या संचालक मंडळाची प्रकरण दडपून टाकण्याची भूमिका त्याहीपेक्षा संतापजनक आहे आणि पोलीसांनी केस नोंदवून घेण्यात केलेली दिरंगाई अक्षम्य आहे. या परिस्थितीत बालिकांना न्याय व सुरक्षितता मिळवून देण्यात अपयशी ठरलेल्या यंत्रणां विरोधात जनक्षोभ उफाळून आला व २० ऑगस्ट रोजी लोक रस्त्यावर येऊन आंदोलन उभे राहिले. लोकांचा राग शाळेच्या चालकांवर आहे त्याचप्रमाणे पोलिस खात्यावरही आहे. वंचित बहुजन आघाडी या घृणास्पद घटनेतील गुन्हेगार शिंदे, घटना झाकून ठेवणारे शाळेचे संचालक मंडळ व पोलीस खाते या सर्वांचा तीव्र निषेध करण्यात येत असल्याचे सांगितले. पुढे बोलताना रेखा ठाकूर म्हणाल्या की, पीडित बालिकांना न्याय मिळवून देण्यासाठी व न्याय प्रक्रिया ही पारदर्शक व कोणत्याही दबाव व हस्तक्षेपा पासून मुक्त राहिल अशी ग्वाही जनतेला मिळाली पाहीजे अशी मागणीही यावेळी केली.

-----------

### सार्वजनिक उद्रेक झाल्याशिवाय

कोर्टाने बदलापूर पोलिसांना केला. ज्या शाळेत कथित घटना घडली त्या शाळेवर लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत का? असेही हायकोर्टाने यावेळी पोलिसांना विचारले. तसेच राज्य शासनाला झापताना खंडपीठाने म्हटले की, ‘‘जर शाळा ही सुरक्षित जागा नसेल, तर मग शिक्षणाच्या अधिकाराबद्दल बोलून काय उपयोग? ४ वर्षांच्या मुलींनाही सोडले जात नाही. ही परिस्थिती काय आहे? हे अत्यंत धक्कादायक आहे, अशी टिप्पणी न्यायमूर्ती मोहिते-डेरे यांनी केली. न्या. रेवती मोहिते-डेरे आणि न्या. पृथ्वीराज के चव्हाण यांच्या खंडपीठाने या घटनेची स्वतःहून दखल घेत याचिकेवर सुनावणी सुरु केली आहे.

---------

### अखेर एमपीएससी

राज्य सरकारने पूर्ण दुर्लक्ष केले होते. त्यावरूनच विद्यार्थ्यांमध्ये रोष वाढला होता. ज्याचा उद्रेक होऊन विद्यार्थी पुण्यात आंदोलन करत होते. तर या आंदोलनास खासदार सुप्रिया सुळे, आमदार रोहित पवार, काँग्रेस नेते माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्यासह इतर नेत्यांनी आपला पाठिंबा दिला होता. तर जेष्ठ नेते शरद पवार यांनी थेट सरकारला इशारा देत विद्यार्थ्यांचा प्रश्न मार्गी लावा अन्यथा आपण आंदोलनात उतरू असे म्हटले होते. त्यानंतर आयोगाने याबाबत आपली भूमिका स्पष्ट करत परीक्षा पुढे ढकलल्याचे म्हटले आहे. याबाबत आयोगाने ट्विट करत माहिती देताना, स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांच्या पार्श्वभूमिवर रविवार, दि. २५ ऑगस्ट २०२४ रोजी नियोजित महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे सांगितले. परीक्षेची नवी तारीख लवकरात लवकर जाहीर करण्यात येईल, असे सांगण्यात आले आहे. दरम्यान, एमपीएससीची संयुक्त पूर्व परीक्षा पुढे ढकलण्यात आल्याची माहिती आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळताच विद्यार्थ्यांनी जल्लोष केला आहे. पण याच परीक्षेत कृषी सेवेतील पदांचा समावेश करण्यात न आल्याने विद्यार्थ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. तसेच नव्या परीक्षेत या पदांचा समावेश करण्यात यावा, अशी मागणी केली आहे. तर विद्यार्थ्यांनी सरकारने कृषी सेवेतील पदांसह १५ हजार पदांच्या नव्या संयुक्त पूर्व परीक्षेची जाहिरात आणि त्याची तारीख जाहीर करावी, अशी मागणी केली आहे. तसेच जोपर्यंत मागणी पूर्ण होत नाही तोपर्यंत आंदोलन सुरूच राहिल अशी ठाम भूमिका विद्यार्थ्यांनी घेतली आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि. २३ ऑगस्ट २०२४


## अखेर वामन म्हात्रे यांच्या विरोधात अजामिनपात्र गुन्हा दाखल

### लगेच अटक करा-मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांची मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

बदलापूर येथील महिला पत्रकार मोहिनी जाधव यांच्याशी असभ्य, अपमानास्पद भाषा वापरल्याबद्दल शिंदे गटाचे शहराध्यक्ष वामन म्हात्रे यांच्या विरोधात ॲट्रॉसिटी आणि महिलांवरील अत्याचार प्रतिबंधक कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.. मोहिनी जाधव काल दुपारपासून वामन म्हात्रे यांच्या विरोधात गुन्हा दाखल व्हावा यासाठी प्रयत्न करीत होत्या मात्र वामन म्हात्रे यांचे राजकीय संबंध लक्षात घेऊन बदलापूर पोलीस गुन्हा दाखल करायला टाळाटाळ करीत होते.. मात्र राज्यभरातील पत्रकारांची संतप्त प्रतिक्रिया लक्षात घेऊन पोलिसांना अखेर गुन्हा दाखल करणे भाग पडले.. आज सायंकाळी हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.. वामन म्हात्रे यांच्यावर खालील कलमे लावण्यात आली आहेत. भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ७४, भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ७९, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती ( अत्याचार प्रतिबंधक ) अधिनियम १९८९, कलम ३(१) ( व ) (२), कलम ३(२) (). दोन्ही गुन्हे अजामीनपात्र असल्याने पोलिसांनी वामन म्हात्रे यांना लगेच अटक करावी अशी मागणी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी केली आहे..

# पिठाला कर लावणाऱ्या भाजपला हाकला-लगड

**गेवराई । प्रतिनिधी**

इंग्रजांनी देशावर राज्य केले, त्यावेळी इथल्या भारतीयांना छळले, त्रास दिला. महागाई वाढवली आणि मिठावर सुद्धा कर लावला. त्यामुळे संतप्त झालेल्या भारतीयांनी मिठाला कर लावणाऱ्या इंग्रजांना महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली मिठाचा सत्याग्रह करून हाकलले. आता तर भाजपच्या सरकारने पिठाला सुद्धा कर लावला आहे त्यामुळे त्यांना सुद्धा हाकला असे रोखठोक आवाहन जिल्हा परिषद चे माजी सभापती पंढरीनाथ लगड यांनी केले आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित हे गेवराई तालुक्यातील प्रत्येक जिल्हा परिषद सर्कल मध्ये भेटी देऊन शिवसैनिक व पदाधिकाऱ्यांशी संवाद साधत आहेत. या पार्श्वभूमीवर दिनांक २१ ऑगस्ट २०२४ रोजी चकलांबा येथे त्यांनी शिवसैनिकांशी संवाद साधला. यावेळी माजी सभापती पंढरीनाथ लगड बोलत होते. कार्यक्रमास माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्यासह अमर टेलर, अजूनभाई पठाण, सरपंच शामदभाई पटेल, शिवसेना अल्पसंख्यांक सेल तालुकाप्रमुख तय्यब पठाण, श्रीमंतराव यादव, युवा सेना उपजिल्हाप्रमुख शेख सिराज, बापूराव महानोर, फैसल चाऊस आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना माजी राज्यमंत्री बदामराव पंडित म्हणाले की, राज्यातल्या सत्ताधाऱ्यांनी काहीही करू द्या, कोणत्याही योजना आणू द्या. परंतु हे सरकार पुन्हा येऊ द्यायचे नाही हे जनतेने ठरवले आहे. त्यामुळे सत्ताधाऱ्यांनाही आपण सत्तेत येणार नाही याची जाणीव झाली आहे. बीडच्या पंडितांनी गेवराई तालुक्यातल्या प्रत्येक गावचा श्रीमंत माणूस गाठून गोरगरिबावर अन्याय करायचे काम केले आहे. ही प्रथा



### चकलांब्यात बदामराव पंडितांचा शिवसंवाद

आपण सामान्य जनतेच्या बळावर मोडीत काढली. हा स्वाभिमान आपल्याला कायम टिकवायचा असेल तर या विधानसभेला शिवसेनेचा भगवा फडकावाच लागेल असे आवाहन करून बदामराव पंडित म्हणाले की, गेवराई तालुक्यातील जनता माझ्या सोबतच आहे. फक्त तुम्ही त्यांना भेटा, माझा निरोप द्या. ते तुम्हाला चहा पाजून मतदान देतील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी तय्यब पठाण, पंढरीनाथ लगड, अमर टेलर, आजमभाई पठाण आणि श्रीमंतराव यादव यांनी रोखठोक भाषणात बोलताना म्हटले की, गोरगरिबांच्या मदतीला धावून येणारा बदामराव पंडित हा एकमेव नेता आहे, जो कोणत्याही अडचणीच्या काळात अर्ध्या रात्री तुमच्या आमच्यासाठी मदतीला सज्ज असतो. आबा हा गरिबांचा नेता आणि जमिनीवरचा माणूस आहे. पंधरा वर्षे आमदार आणि मंत्री राहूनही आबा कधी कोणाशी टाईट वागले नाही. अठरापगड जातींना सोबत घेऊन काम करत असल्याने दहा वर्षे आमदार नसूनही बदामराव पंडित यांना जनतेने आजही आपल्या डोक्यावर घेतलेले आहे. गेवराई तालुक्यातील हुकूमशाहीचे राजकारण संपून लोकशाही आणण्यासाठी आबांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यामुळेच त्यांना विधानसभेत पाठविणे ही सामान्य जनतेची गरज असल्याचे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरिभाऊ गलधर यांनी केले तर आभार आकाश खेडकर यांनी मानले. कार्यक्रमास सरपंच शाहमद पटेल, उपसरपंच महादेव कारंडे, कैलास राठोड, अफजल भाई, शफीक भाई, योगेश कासार तात्या, फिरोज भाई शेख, शेख सिकंदर, रामभाऊ पौळ, मधुकर गंडे, बळीराम उघडे, बंडूभाऊ नवले, शौकत पटेल, सय्यद हमीद भाई, नारायण घाडगे, बाळासाहेब कापसे, सुखदेव निंबाळकर, भीमराव कुलाळ, नामदेवराव निंबाळकर, बळीराम सांगळे, कृष्णा सांगळे, तुळशीराम गलधर, राजू नाडे, मोहन सूर्यवंशी, श्रीकृष्ण गळगट्टे, तुळशीराम गलधर, शिवसैनिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नराधम, दोषींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे -ॲड. नारायण गोले

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्रात अराजकता निर्माण झाली असून बदलापूर येथील चिमूरड्या मुलींवर बलात्कार करणाऱ्या नराधम, दोषींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे असे आवाहन आवाहन माजलगाव तहसील कार्यालय येथे आज दिनांक २२ ऑगस्ट रोजी निवेदनाद्वारे भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी केले आहे.

महाराष्ट्रात लाडक्या बहिणीच्या घोषणा करणारे मुख्यमंत्री, गृहमंत्री, लहान मुलींची महिलांची सुरक्षा करण्यात पूर्णतः अपयशी ठरलेले असून महिलांच्या, मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून बदलापूर येथील अत्याचाराच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरलेला असून चिमुकलीवर बलात्कार करणाऱ्या नराधम,दोषींवर गुन्हे नोंदवून सदरील प्रकरण जलद न्यायालयात चालवण्यात येऊन कठोर



बदलापूर प्रकरणी शेकापचे तहसीलदारांना निवेदन

कार्यवाहीसाठी प्रकरणात भारतीय जनता पक्षाच्या संबंधित असणाऱ्या सरकारी वकील उज्वल निकम यांची निवड न करता, दुसरा सरकारी वकील नेमण्यात येऊन प्रकरणातील नराधम, दोषींना फाशीची शिक्षा झाली पाहिजे तसेच महाराष्ट्रात अराजकता निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर नैतिक जबाबदारी स्वीकारून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राजीनामे द्यावेत अन्यथा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे मध्यवर्ती समिती सदस्य भाई ॲड नारायण गोले पाटील, शेतकरी कामगार पक्षाचे माजलगाव तालुका चिटणीस भाई मुंजा पांचाळ, शेतकरी कामगार पक्षाचे खजिनदार भाई विष्णू शेळके, पुरोगामी युवक संघटनेचे तालुका अध्यक्ष भाई अशोक कुलकर्णी, पुरोगामी युवक संघटनेचे खजिनदार भाई राधाकृष्ण पांचाळ, शेतकरी सभेचे तालुका अध्यक्ष भाई सुदाम चव्हाण, शेतकरी सभेचे तालुका चिटणीस भाई माऊली चंदनशिव, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरद पवार गट जिल्हा उपाध्यक्ष नुमान चाऊस, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे कॉम्रेड सय्यद रज्जाक, कॉम्रेड सय्यद फारुख यांच्यासह शेकडो कार्यकर्ते,महिला भगिनी यांनी निवेदनाद्वारे दिला असून यावेळी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने शासनाच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी करत शासनाचा निषेध करण्यात आला. यावेळी तहसील परिसर घोषणाबाजींनी दणाणून गेला होता.

## राज्य सरकार इतकेच शेतकरीही अलर्ट!

**परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी**

परळी वैजनाथ येथे बुधवारी दिमाखदार सोहळ्यात उद्घाटन संपन्न झालेल्या कृषी महोत्सवात नमो शेतकरी महासंन्मान योजनेचा प्रत्येकी दोन हजार रुपयांचा हप्ता एका क्लिकवर ९१ लाख शेतकऱ्यांना वितरित करण्यात आला. यावेळी राज्य सरकार जितके अलर्ट आहे तितकेच अलर्ट शेतकरी सुद्धा असल्याची अनुभूती आली आहे.

झाले असे की, कृषी महोत्सवाच्या उद्घाटनाच्या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत नमो शेतकरी महासन्मान योजनेच्या चौथ्या हप्त्याचे ऑनलाईन वितरण करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी पैसे मिळाले का? असे विचारताच सभागृहात बसलेल्या हजारो शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा झाल्याचे मेसेजेस त्यांच्या मोबाईलवर आले.

त्याचबरोबर कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या



विनंतीवरून सोयाबीन कापूस उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान देण्यासाठी ई-पीक पाहणीची घातलेली अट मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात रद्द करत असल्याचे जाहीर केले.

याचा दुहेरी आनंद झालेल्या शेकडो

**धनंजय मुंडेंच्या स्वीय सहाय्यकांनी दाखवले शेतकऱ्यांचे मेसेज, मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री यांनी हात उंचावून शेतकऱ्यांना दिली दाद**

शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री तसेच कृषी मंत्री यांचे आभार मानणारे मेसेजेस धनंजय मुंडे यांच्या स्वीय सहाय्यकांकडे पाठवले व आपले मेसेज मान्यवरांपर्यंत पोहोचवण्याची विनंती केली. धनंजय मुंडे यांच्या स्वीय सहाय्यकांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना शेतकऱ्यांनी पाठवलेले ते मेसेज दाखवले असता त्यांनी समोर बसलेल्या शेतकऱ्यांना हात उंचावून दाद दिली, त्याचबरोबर कार्यक्रम संपवून निरोप घेताना अनेक शेतकऱ्यांनी भेटून देखील मुख्यमंत्री व दोन्हीही उपमुख्यमंत्र्यांचे आभार व्यक्त केले.

## नागरी सहकारी बँक्स् असोसिएशनचा बीड येथे शनिवारी रोप्य महोत्सवी सोहळा

बीड । प्रतिनिधी

नागरी सहकारी बँकेचा विकास साधण्यासाठी बीड जिल्हा नागरी सहकारी बँक्स्? असोसिएशन लि. बीडची स्थापना झाली, त्यास २५ वर्ष पूर्ण झाले आहेत, त्या प्रित्यर्थ शनिवार २४ ऑगस्ट रोजी 'रौप्य महोत्सव समारंभ'' मान्यवरांच्या उपस्थितीत माँ वैष्णव पॅलेस एमआयडीसी बीड येथे साजरा होत आहे.

बीड शहरातील शिवाजी नगर येथील छत्रपती शाहू बँक शिवाजीनगर शाखा अर्जुन भवन येथे गुरुवारी दि.२२ रोजी पत्रकार परिषद घेण्यात आली. बीड जिल्हा नागरी सहकारी बँक्स्? असोसिएशनचे अध्यक्ष सत्यनारायण लोहिया यांनी माहिती दिली. यावेळी छत्रपती शाहू बँकचे अध्यक्ष अजय जाहेर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी बी. ई. पवार उपस्थित होते.

बीड जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशनचे अध्यक्ष



सत्यनारायण लोहिया म्हणाले, सुशासन आणि अनुपालन ,नागरी सहकारी बँके पुढील आव्हाने, गव्हर्नर आरबीआय यांनी नागरी सहकारी बँक संदर्भात सांगितलेल्या मुद्द्याबाबत मार्गदर्शन. संचालक मंडळ व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे उत्तरदायित्व व कर्तव्य या आणि अशा विविध विषयावर मार्गदर्शन या रौप्य महोत्सव समारंभाच्या निमित्ताने होणार आहे. भारतीय रिझर्व बँकेचे संचालक सतीशजी मराठे, दि महाराष्ट्र अर्बन को ऑफ बँक फेडरेशन लि मुंबईचे अध्यक्ष अजय ब्रह्मेचा. दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन लि मुंबईचे अध्यक्ष विश्वास ठाकूर, दि नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन बँक दिल्लीचे संचालक सुनील देवडा, संचालक दिलीप चव्हाण, मुकुंदकुमार कळमकर या मान्यवर प्रमुखांची उपस्थिती रौप्य महोत्सव समारंभाच्या निमित्ताने राहणार आहे. बँकिंग क्षेत्रातील सर्वांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास शनिवारी सकाळी १०:३० वाजता उपस्थित राहावे असे आवाहन बीड जिल्हा नागरी सहकारी बँक्स्? असोसिएशनचे अध्यक्ष सत्यनारायण लोहिया, उपाध्यक्ष ॲड. मकरंद पत्की, सचिव भगवान पवार यांनी केले आहे.

## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर महसूल व कृषी विभाग -डॉ.ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश महसूल मंडळात अतिवृष्टी झाली असुन ९५.३ मि.मि.पाऊस झाल्याने शासन दरबारी नोंद झाली आहे.दोन दिवसांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे मका, सोयाबीन, कांदा आदि पिके पाण्याखाली गेली आहेत तर काही ठिकाणी भुईसपाट झाली आहेत.संबधित प्रकरणात महसूल आणि कृषी विभागाच्या आधिकारी व कर्मचाऱ्यांनी नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर पाहणी करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी तहसीलदार व तालुका कृषी अधिकारी यांना काल



दि.२१ रोजी केल्यानंतर व याविषयी विविध दैनिकात बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर आज दि.२२ गुरुवार रोजी तहसीलदार चंद्रकांत शेळके आणि तालुका कृषी अधिकारी बी.आर.गंडे यांच्या आदेशावरून तलाठी गणपत पोतदार आणि कृषी सहाय्यक लिंबागणेश आनंद वाघ आणि रामेश्वर पेजगुडे यांनी नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली. शेतकऱ्यांसमवेत संवाद साधला.सधरील ठिकाणी अतिवृष्टीमुळे पाणी साचलेले असुन पिके जमिनीवर लोळलेल्या अवस्थेत दिसुन आली असुन संयुक्त अहवाल तहसीलदार चंद्रकांत शेळके आणि तालुका कृषी अधिकारी बी. आर. गंडे यांना पाठविण्यात येणार असल्याचे सांगितले.

## प्रयागाबाई कटारे यांचे निधन

दिंद्रुड । प्रतिनिधी



येथील प्रयागाबाई एकनाथराव कटारे (वय ८४ वर्ष )यांचे वृद्धापकाळाने गुरुवारी पहाटे निधन झाले, दिंद्रुड येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले, पश्चात दोन विवाहित मुली, तीन मुले,नातवंडे असा परिवार आहे. प्रगतशील शेतकरी सुखदेव कटारे व सहशिक्षक परशुराम कटारे यांच्या त्या आई होत.

पान ६ वरून...

### ग्रामरोजगार सेवकाचे पंचायत

जे अहवाल तयार केला त्या अहवालाची प्रत ची रीतसर मागणी पत्राद्वारे केली होती. परंतु आज तागायत आपल्या कार्यालयाकडून कुठल्याही प्रकारे मला माहिती देण्यात आलेली नाही दि. १४/८/२०२४ रोजी नवीन ग्राम रोजगार सेवक नियुक्ती संदर्भात ग्रामपंचायत कार्यालयाने बैठकीत घेतलेल्या विषयाची तोंडी केलेल्या प्रोसिडिग प्रत देण्यात यावी तसेच तक्रार क्र.१ पासून ते आपल्या अहवाला पर्यंतचे सर्व माहिति अहवाल दि.१९/८/२०२४ २४ पर्यंत देण्यात यावे नसता दि.२२/८/२० २४ रोजी पंचायत समिती कार्यालयासमोर उपोषणास आहे असे निवेदन पत्र देऊन देखील याची कार्यालयीन स्तरावर दखल घेतली नाही अर्ज करून मागणी केलेल्या ग्राम रोजगार सेवकाच्या विरोधात ग्रामपंचायतला प्राप्त झालेल्या तक्रार अर्जाची प्रत, ग्रामपंचायत ने ग्राम रोजगार सेवकाला पाठवलेला नोटिसा, ग्रामरोजगार सेवकांनी नोटीसाला दिलेले खुलासे, ग्रामपंचायतला प्राप्त झालेल्या नोटीसानुसार ग्रामपंचायत स्तरावर ग्रामसेवक यांनी केलेलं चौकशी अहवाल, पंचायत समिती स्तरावरून विस्ताराधिकारी यांनी केलेला चौकशी अहवाल, ग्राम रोजगार सेवकाला पदमुक्त केलेल्या आपल्या कार्यालयास सादर केलेल्या अहवालाची प्रत, माननीय गटविकास अधिकारी यांनी चौकशी करून ग्रामपंचायतला पाठवलेले अहवालाची प्रत मिळाली नसून व मी मागील माझ्या खुलासा मधील मागणी केलेल्या अहवालाची मागणी केली होती ते पण मला यावरील अहवाला बरोबर देण्यात यावे आशा केलेल्या मागण्यांची दखल न घेतल्यामुळे ग्रामपंचायत गोविंदवाडी येथील ग्रामरोजगार सेवक अनंत बन्सीधर जाधवर हे आज दि. २२/८/२०२४ रोजी पंचायत समिती कार्यालय माजलगाव येथे आमरण उपोषणास बसले आहेत.

### बीड जिल्ह्यातील

कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी हे कोणत्याही प्रकारची मदत व सहकार्य करीत नाहीत. तसेच एनआयसी, बीड येथून मराठा समाजाला मिळालेले कुणबी पुरावे तपासून वेबसाईटवर अपलोड करण्यास दिरंगाई होत आहे. त्यामुळे महसूल, समाजकल्याण कार्यालयात आवश्यक प्रशिक्षित मनुष्यबळ, तंत्रज्ञ तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावेत. जात पडताळणी समिती सक्षम कराव्यात. राज्यासह बीड जिल्ह्यातील जात पडताळणी समित्यांना नियमित व पुर्ण वेळ अध्यक्ष उपलब्ध करून देण्यात यावेत. जात पडताळणी (व्हॅलिडीटी) चा सहा महिन्यांचा कालावधी कमी करण्यात यावा. व तात्काळ पडताळणी करण्यात येवून प्रमाणपत्र देण्यात यावे. तरी या प्रकरणी तात्काळ लक्ष देऊन मराठा समाजातील विद्यार्थ्यांना योग्य तो न्याय द्यावा, या समस्या सोडवाव्यात अशी विनंती व सहकार्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी बीड यांना देण्यात आली आहे. सदरील निवेदनावर अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण, पत्रकार रमाकांत पाटील, बीड जिल्हा प्रसिध्दीप्रमुख रणजित डांगे, पांडुरंग देशमुख, ऍड.बापू मोरे, विजय चव्हाण, ओमकार चव्हाण, लहू शिंदे आदींसह इतरांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## मुख्यमंत्री साहेब, लाडक्या बहिणीला दीड हजार साठी इतका त्रास का ? - गणेश कवडे

**पाटोदा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारच्या वतीने मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना सुरू करण्यात आली असून या योजनेमधून महिन्याला दीड हजार रुपये मिळणार आहेत परंतु हेच दीड हजार मिळवण्यासाठी लाडक्या बहिणीला फॉर्म भरण्यासाठी काहींना केवायसी करण्यासाठी तर काहींना आधार लिंक करण्यासाठी दोन-चार दिवस चक्र माराव्या लागत असून दीड हजारापेक्षा जास्त खर्च होत असून मानसिक त्रास आर्थिक नुकसान देखील होत आहे, मग लाडक्या बहिणीला इतका त्रास होत असेल तर मग लाडकी बहीण कशाची असा प्रश्न उपस्थित होत आहे. पाटोदा तालुक्यातील मुख्यमंत्र्याच्या लाडक्या बहिणींचे दुःख जाणून घेण्यासाठी शेतकरी नेते गणेश कवडे धावून आले असून व्यथा ऐकून घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना व तहसीलदार यांना निवेदन देऊन तात्काळ प्रश्न सोडवावा अशी मागणी केली आहे.

मुख्यमंत्र्यांनी जरी लाडकी बहीण योजना सुरू केली असली तरी त्या योजनेत अनेक अडचणी येत असून अनेक महिलांना याचा फायदा देखील होताना दिसत नसून मग इतका त्रास असेल तर लाडकी बहीण म्हणता का ? हा प्रश्नही उपस्थित पाटोदा तालुक्यातील महिलांनी केला आहे. योजना सुरळीत चालू करायची नसेल तर तात्काळ बंद करा आणि लाडक्या बहिणीला सुखानं जगू द्या असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे. पाटोदा तालुक्यातील एसबीआय बँक छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे दररोज ३०० ते ४०० महिला येत असून फक्त ५० महिलांचे हेच काम होत असताना दिसत आहे.



या महिलांच्या तक्रारी येऊ लागल्याने शेतकरी नेते गणेश कवडे यांच्या कानावर हा विषय गेला आणि त्यांनी तात्काळ छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे धाव घेत महिलांची विचारपूस केली आणि संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देऊन सूचना करून बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनाही या संदर्भात माहिती देऊन त्यांनी तात्काळ अधिकाऱ्यांना सूचना केल्या असून महिलांना कसलीच अडचण येणार नाही याची खबरदारी घ्या असे देखील सांगितले आहे.

**गणेश कवडे यांचा खासदार बजरंग बप्पांना फोन तर बप्पांचा अधिकाऱ्यांना फोन**

पाटोदा तालुक्यातील महिलांच्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत फॉर्म केवायसी आधार लिंक करण्याचे काम सुरू असून छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील बँकेमध्ये दररोज ३०० ते ४०० महिला येत असून फक्त ४० ते ५० महिलांचे काम होत असून इतर महिलांना वापस जावं लागत आहे दोन चार दिवस झालं या महिला चकरा मारत असून योजनेच्या पैशापेक्षा स्वतःचे पैसे जास्त खर्च होत असल्याने महिलांनी शेतकरी नेते गणेश कवडे यांना फोन करून ची अडचण सांगितली तात्काळ गणेश कवडे यांनी धाव घेत खासदार साहेबांना फोन करून हा विषय सांगितला तर खासदार साहेबांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ सूचना करून लवकरात लवकर सुरळीत करा असे आदेशही दिले आहे.

**संबंधित बँक अधिकारी आणि तहसीलदार यांना योजनेबाबत निवेदन**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत सुरू असलेल्या फॉर्म भरणा प्रक्रियेला मोठ्या प्रमाणात अडचण येत असून बँकेमध्ये महिलांना मानसिक आर्थिक त्रास होत आहे याबद्दल शेतकरी नेते गणेश कवडे यांनी संबंधित बँक अधिकारी व तहसीलदार यांना निवेदन देऊन योजनेची प्रक्रिया सुरळीत करावी अन्यथा बंद करा असंच डायरेक्ट आवाहन केले असून महिलांना अडचणी येणार नाहीत यासाठी तात्काळ योग्य ते पाऊल उचलून योजना सुरळीत होऊन त्यांच्या खात्यावर पैसे मिळावेत अशी मागणी केली आहे.

# जळगावच्या केळीला इराणमध्ये मोठी मागणी

## एक केळीच्या घडाचे वजन ३५ किलोंचे, लाखोत कमवतोय शेतकरी

जळगावची केळी ही महाराष्ट्रात सर्वात लोकप्रीय समजली जाते. दर्जेदार उत्पन्नासह देशातच नाही पण परदेशातही निर्यात करण्यावर शेतकरी भर देत असल्याचं दिसतं. आता जळगावच्या भडगाव तालुक्यातील एका शेतकऱ्यानं केळीची निर्यात करत लाखोंमध्ये नफा कमावलाय. राजेंद्र पाटील या शेतकऱ्याच्या शिवारातल्या केळीचा डंका आता आखाती देशात वाजतोय. इराणमध्ये निर्यात करत एकरी अव्वल उत्पादन त्यांनी घेतलंय. त्यांच्या एका केळीच्या घडाचं वजन तब्बल ३५ किलो आहे. एरवी प्रतिक्विंटल १२०० ते १४०० रुपयांचा भाव केळीला मिळत असताना निर्यात करत क्विंटलमागे तब्बल १७५० रुपयांचा भाव त्यांना मिळतोय.

तंत्रज्ञानाचा योग्य वापर करत फळबागा जपणं तसं कठीण काम. बदलत्या हवामानात टिकाव धरत भरघोस उत्पन्न मिळवत या शेतकऱ्याने लाखो रुपयांचा नफा मिळवल्याचं दिसतंय. गिरणा नदीच्या समृद्ध तालुक्यांमध्ये केळीचं उत्पादन जळगाव केळीचं आगार समजलं जातं. पाण्याचं योग्य नियोजन करत जवळपास सर्वच तालुक्यांमध्ये कमी



अधिक प्रमाणात केळीचं उत्पादन घेतलं जातं. गिरणा नदीच्या पाण्यानं समृद्ध असणाऱ्या पाचोरा आणि भडगाव परिसरात केळीचं पीक मोठ्या प्रमाणावर घेतात. याच भडगाव तालुक्यातील राजेंद्र पाटील या केळी उत्पादक शेतकऱ्यानं आपली केळी थेट इराणला निर्यात करत चांगला नफा कमावलाय. साधारण ३५ ची रास त्यांच्याकडे असून प्रतिक्विंटल १७५० रुपयांचा नफा त्यांना मिळाला आहे.

परदेशी निर्यात करत लाखात कमाई : राजेंद्र पाटील यांची सहा एकर शेती असून त्यांनी ९००० टिश्यूकल्चर केळीच्या रोपांची लागवड केली आहे. सध्या त्यांच्या शेतात केळीची काढणी सुरु असून देशांतर्गत आणि परदेशीही ते केळी पाठवतात. इराणमध्ये राजेंद्र पाटील यांच्या केळीला वाव मिळाला असून त्यांना भरघोस उत्पन्न घेतलं आहे. केळीला साधारणपणे १२०० ते १४०० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळत असताना १७०० रुपयांचा भाव त्यांना मिळाल्यानं विक्रमी कमाई त्यांनी केल्याचं बोललं जातंय. खत, मशागत आणि पाण्याचे व्यवस्थापन करत भडगाव तालुक्यातून इराणला निर्यात करत केळीतून त्यांनी विक्रमी कमाई केली आहे. केळीचा घड ३५ किलोंचा! : साधारणपणे केळीच्या सामान्य घडाचं वजन २० ते २५ किलो एवढे असते. पण आधुनिक पद्धतीने आणि तंत्रज्ञानाचा वापर करत नियोजन साधल्याने या शेतकऱ्याच्या केळीच्या एका घडाचे वजन तब्बल ३५ किलोंचे भरले आहे. त्यामुळेच या केळीला चांगला भाव मिळाल्याचे सांगण्यात येत आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८३९ : युनायटेड किंगडमने हाँगकाँगचा ताबा घेतला.
१९१४ : पहिले महायुद्ध जपानने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.
१९४२ : मो. ग. रांगणेकर यांच्या 'कुलवधु' नाटकाचा पहिला प्रयोग झाला.
१९४२ : दुसरे महायुद्ध स्टालिनग्राडची लढाई सुरू
१९६६ : 'लूनार ऑर्बिटर-१' या मानवरहित अंतराळयानाने चंद्रावरून पहिल्यांदाच पृथ्वीची छायाचित्रे काढली.
१९९० : आर्मेनियाने आपण (सोविएत युनियनपासुन) स्वतंत्र असल्याचे जाहीर केले.
१९९१ : वर्ल्ड वाईड वेब सार्वजनिक उपयोगासाठी सुरु झाले.
१९९७ : हळदीच्या पेटंटबाबतचा अमेरिकेशी चालू असलेला कायदेशीर लढा भारताने जिंकला. एखाद्या विकसनशील देशाने अमेरिकन पेटंटला आव्हान देऊन तो जिंकण्याची ही पहिलीच घटना आहे.
२००५ : कविवर्य विंदा करंदीकर यांना ज्ञानपीठ पुरस्कार प्रदान
२०११ : लीबीयातील हुकुमशहा मुअम्मर गडाफीची सत्ता उलथण्यात आली.
२०१२ : राजस्थानात अतिवृष्टीमुळे ३० जण ठार!


### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७५४ : लुई (सोळावा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: २१ जानेवारी १७९३)
१८५२ : भारतीय वैद्य आणि दानकर्ते राधा गोबिंद कार यांचा जन्म. (मृत्यू: १९ डिसेंबर १९१८)
१८७२ : भारतीय वकील आणि राजकारणी तांगुतरी प्रकाशम यांचा जन्म. (मृत्यू: २० मे १९५७)
१८७५ : भारतीय स्वतंत्रतासेनानी व चंपारण्य संग्रहाचे प्रमुख सदस्य राजकुमार शुक्ल यांचा जन्मदिन.
१८९० : न्यूज-डे चे सहसंस्थापक हॅरी फ्रँक गग्रेहॅम यांचा जन्म. (मृत्यू: २२ जानेवारी १९७१)
१९१८ : गोविंद विनायक तथा 'विंदा' करंदीकर लेखक, कवी, लघुनिबंधकार व टीकाकार.
१९४४ : सायरा बानू चित्रफट अभिनेत्री
१९५१ : नूर जॉर्डनची राणी
१९७३ : मलाईका अरोरा खान मॉडेल व अभिनेत्री

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

६३४ : अबू बकर अरब खलिफा (जन्म: ? ? ५७३)
१३६३ : डहाण राजवटीचे संस्थापक चेन ओंलियांग यांचे निधन.
१८०६ : चार्ल्स कुलोम फ्रेन्च भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: १४ जून १७३६)
१८९२ : ब्राझीलचे पहिले अध्यक्ष डियोडोरो डा फोन्सेका यांचे निधन. (जन्म: ५ ऑगस्ट १८२७)
१९७१ : रतन साळगावकर ऊर्फ हंसा वाडकर मराठी व हिन्दी चित्रपट अभिनेत्री (सांगत्ये ऐका, लोकशाहीर रामजोशी, विजयाची लग्ने, संतसखू, रामशास्त्री, आजाद, नवजीवन, धन्यवाद, मेरे लाल). 'सांगत्ये ऐका' नावाचे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिद्ध आहे. (जन्म: २४ जानेवारी १९२४)
१९७४ : डॉ. शंकर दामोदर पेंडसे मराठी ग्रंथकार आणि संतसाहित्याचे गाढे अभ्यासक. पंढरपूर येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे (१९५५) ते अध्यक्ष होते. (जन्म: २८ फेब्रुवारी १८९७)
१९७५ : पं. विनायकराव पटवर्धन नामवंत शास्त्रीय गायक, गुरू, संगीतप्रसारक व अभिनेते. १९३२ मध्ये त्यांनी पुण्यात गांधर्व महाविद्यालयाची स्थापना केली. (जन्म: २२ जुलै १८९८)
१९९४ : आरती साहा इंग्लिश खाडी पोहून जाणारी पहिली भारतीय महिला जलतणपटू (जन्म: २४ सप्टेंबर १९४०)
१९९७ : ग्रेनाडा चे पहिले पंतप्रधान एरिक गेयरी यांचे निधन. (जन्म: १८ फेब्रुवारी १९२२)
२००३ : भारतीय कन्नड भाषिक लेखक ए. एन. मूर्ती राव यांचे निधन.
२०१३ : आर.जे. कॉमन रेल्वेमार्ग गटाचे संस्थापक रिचर्ड जे. कॉर्मन यांचे निधन. (जन्म: २२ जुलै १९५५)

# निलगायींना पिकांपासून दूर ठेवण्यासाठी करा देसी जुगाड



वन्य प्राणी आणि नीलगाय शेतात घुसून पिकांची नासधूस करत असल्याचे अनेकदा दिसून येते, त्यामुळे शेतकऱ्याला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. शेतकऱ्यांची ही अडचण लक्षात घेऊन यावर उत्तम देशी जुगाडाचा चांगला फायदा घेता येऊ शकेल. हा देसी जुगाड कमी खर्चिक आहे. यासाठी शेतकऱ्याला जास्त कष्ट करण्याची गरज नाही.

पवनचक्की गिरणी : भटके प्राणी आणि नीलगाय यांच्यापासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी देशी पद्धतीचा वापर केला जाऊ शकतो.


हा देशी जुगाड पवनचक्कीच्या आकारात आहे, जो वारा सुटला की आपोआप हलू लागतो. शेतकऱ्यांनी ही गिरणी त्यांच्या शेतातील कोणत्याही खांबावर किंवा लाकडावर टांगली पाहिजे. जो वारा वाहताना आपोआप मोठा आवाज करेल. कारण या गिरणीत एक घंटा बांधलेली असते जी पंखा सुरू झाल्यावर खूप मोठा आवाज करते, जे ऐकून वन्य प्राणी आणि नीलगाय शेतातून पळून जातील.

मिरची आणि लसूण द्रावण : नीलगायपासून त्यांच्या पिकांचे संरक्षण करण्यासाठी शेतकरी मिरची आणि लसूणचे द्रावण देखील वापरू शकतात. शेतकऱ्याला हे दोन्ही मिश्रण शेतात पुर्णपणे शिंपडावे लागते. असे केल्याने शेतातून उग्र वास येईल आणि मग शेताच्या आजूबाजूला नीलगाय दिसणार नाही. मिरची आणि लसूण यांचे मिश्रण तयार करण्यात जास्त खर्च सुद्धा होणार नाही.

# आता बटाट्यापासूनही होणार इथेनॉल निर्मिती, हिमाचल प्रदेशचा पुढाकार

शिमला : ऊस आणि धान्यानंतर आता बटाट्यापासूनही इथेनॉल तयार होणार आहे. केंद्रीय बटाटा संशोधन संस्था (सीपीआरआय, शिमला) बटाट्यापासून बायो इथेनॉल तयार करण्यासाठी बटाट्याच्या नवीन जाती विकसित करणार आहे. हिमाचल प्रदेशचे राज्यपाल शिव प्रताप शुक्ला यांच्या सूचनेनुसार 'सीपीआरआय'च्या शास्त्रज्ञांनी २०२५ पर्यंत इथेनॉल तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून, हे लक्ष्य गाठण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. आता ऊस आणि धान्य उत्पादक शेतकऱ्यांसोबत बटाटा उत्पादक शेतकऱ्यांनाही मोठा फायदा मिळू शकतो.

'सीपीआरआय'च्या क्रॉप फिजियोलॉजिकल बायोकेमिस्ट्री आणि पोस्ट-हार्वेस्ट टेक्नॉलॉजी विभागाचे अध्यक्ष डॉ. धर्मेंद्र कुमार आणि त्यांचे सहकारी डॉ. धर्मेंद्र कुमार यांनी बायो इथेनॉल बनविण्यास सक्षम असलेल्या बटाट्याच्या जाती ओळखून बायो इथेनॉल तयार केले आहे. सीपीआरआय नवीन बटाटा वाण विकसित करत नाही तोपर्यंत खराब बटाट्यापासून इथेनॉल तयार केले जाईल. देशातील एकूण बटाटा उत्पादनापैकी सुमारे १५ टक्के बटाटा विविध कारणांमुळे खराब होतो. त्यामुळे पहिल्यांदा खराब झालेला आणि अतिरिक्त उत्पादित बटाटे इथेनॉल उत्पादनासाठी वापरले जातील. सीपीआरआयचे संचालक डॉ.ब्रजेश सिंग यांनी सांगितले की, बटाट्यापासून इथेनॉल तयार करण्यासाठी संस्थेत घेण्यात आलेल्या चाचण्या यशस्वी झाल्या आहेत. ऊस, अन्नधान्य याच्या माध्यमातून इथेनॉल उत्पादन वाढीसाठी केंद्र सरकार ने पाठबळ दिले आहे. २०२५ पर्यंत पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळण्याचे भारताचे उद्दिष्ट आहे. यासाठी ९९० कोटी लिटर वार्षिक पुरवठा होणे गरजेचे आहे. त्यासाठी सरकार ने कंबर कसली आहे. केंद्राने



मक्यासारख्या पिकांचे क्षेत्र वाढीसाठी प्रयत्न सुरू केल्याने साखर व धान्यापासून तयार होणाऱ्या इथेनॉल निर्मितीत पुढील वर्षात, नोव्हेंबर २०२४ ते ऑक्टोबर २०२५ पर्यंत ६०० कोटी लिटरपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. यंदाच्या हंगामात हे उत्पादन ३८० कोटी लिटरपर्यंत झाले आहे.क्रिसिल रेटिंग या औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कंपनीने हा अंदाज वर्तवला आहे. २०२१ पासून केंद्राच्या प्रोत्साहनाने प्रत्येक वर्षी इथेनॉल मिश्रणात वाढ झाली.

यंदा साखर उद्योगातील अनेक संस्थांनी पुढील हंगामाच्या प्रारंभापर्यंत गरजेपेक्षा जास्त साखर शिल्लक राहील, असा अंदाज व्यक्त केला आहे.गेल्या वर्षी पाऊस नसल्याने मक्यासह अन्य धान्याच्या उत्पादकतेवर परिणाम झाला, यामुळे धान्यावर आधारित इथेनॉल निर्मिती होऊ शकली नाही. तर दुसरीकडे कमी साखर उत्पादनाचा अंदाज वर्तविण्यात आल्याने इथेनॉलकडे वळविण्यात येणाऱ्या साखरेवर ही निर्बंध घालण्यात आले. या दोन्ही घटकांचा मोठा फटका इथेनॉल निर्मितीला बसला. याचा प्रतिकूल परिणाम इथेनॉल तयार करण्यावर झाला होता. यंदा ४० लाख टनांपर्यंत पर्यंत साखर इथेनॉलसाठी वापरण्यात येऊ शकते असा अंदाज आहे.

# शेळ्या, मेंढ्यांतील लसिका ग्रंथींचा आजार

पशुधनाच्या शरीराचे कार्य सुरळीत चालण्यासाठी शरीरामध्ये वेगवेगळ्या प्रणाली कार्यरत असतात जसे की पचनसंस्था, श्वसनसंस्था, लसिका प्रणाली, चेतासंस्था इत्यादी. लसिका प्रणाली ही शरीराच्या रोगप्रतिकारक यंत्रणेचा एक भाग आहे, जी शरीरात विविध मार्गांनी कार्य करते उदा. रोगप्रतिकारक शक्ती तयार करणे, द्रव संतुलन, पोषक द्रव्ये वाहून नेणे, फाटलेल्या पेशींची दुरुस्ती, टॉक्सीन आणि निकामी पदार्थांचे व्यवस्थापन करणे. लसिका प्रणालीत बिघाड/ संसर्ग झाल्यास क्षयरोग, लसिका ग्रंथीचा कर्करोग, केसियस लिम्फैडेनाइटिस, संसर्गजन्य आजारात लसिका ग्रंथींना सूज येणे हे होऊ शकतात. केसियस लिम्फॅडेनाइटिस हा करोनिबॅक्टेरियम सुडोट्यूबर्क्यूलोसिस या जिवाणूंमुळे होणारा संसर्गजन्य आजार आहे. या आजारामुळे लिम्फॅटिक प्रणालीवर विपरीत परिणाम होतो.

या आजाराला ग्रामीण भाषेत गळू असेही म्हणतात.हा आजार जनावरातील क्षयरोगाशी मिळताजुळता आहे. याचे जिवाणू शरीराच्या आतल्या पेशीत वास्तव्य करतात आणि तेथे त्यांची वाढ होते. या आजारात मरतुक खूप कमी प्रमाणात आहे, लक्षणेसुद्धा ठळक स्वरूपात नसतात. पण आजारामुळे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी आजाराची माहिती आवश्यक आहे.

१) आजार मुख्यतः शेळ्या आणि मेंढ्यांमध्ये आढळतो. २) शरीरावरील एक



किंवा अधिक लसिका ग्रंथीला सूज येते आणि त्यामध्ये पूयुक्त पदार्थ तयार होतो. अंतर्गत महत्त्वाच्या अवयवात गळू होतात. ३) आजाराचे मुख्यतः दोन स्वरूपामध्ये विभाजन केले जाते. पहिले बाह्य स्वरूप व दुसरे अंतर्गत स्वरूप. या आजाराचे दोन्ही प्रकार शेळ्या आणि मेंढ्यांमध्ये आढळून येतात. पण बाह्य स्वरूप हे शेळ्यांमध्ये तर अंतर्गत स्वरूप हे मेंढ्यांमध्ये दिसते.

आर्थिक नुकसान : १) शरीराच्या वाढीवर विपरीत परिणाम होतो, लहान पिलांची वाढ खुंटते. २) मेंढ्यामध्ये लोकर, शेळ्यांमध्ये मांस उत्पादनात घट होते. ३) जनावराची पुनरुत्पादन कार्यक्षमता घटते. ४) बाधित जनावरांद्वारे कळपात संसर्ग झपाट्याने पसरतो. त्यामुळे बाधित जनावर कळपातून काढावे लागते. ५) बाधित जनावरांत उपचाराअभावी मृत्यू होतो.

आजाराचा प्रसार : १) बाधित जनावरांच्या शरीरावर तयार झालेले गळू जेव्हा पिकून फुटतात तेव्हा त्याच्यातील पूयुक्त स्राव हा गोठ्याचे वातावरण दूषित करतात. २) बाधित जनावरांमुळे आजूबाजूचा चारा, पाणी, माती, कुरण दूषित होते. ३) हे जिवाणू चारा, गव्हाण, पाण्यामध्ये जवळपास दोन महिने टिकून तग धरून राहतात. मातीमध्ये आठ महिने एवढा जास्त काळ टिकून राहतात. ४) शेळ्या-मेंढ्यांमध्ये शरीराला झालेली कोणतीही जखम जसे की, जनावरांच्या ओळखीसाठी बिल्ले लावले जातात. त्यामध्ये जो चिमटा वापरतो जातो तो निर्जंतुकीकरण केलेला नसेल तर त्या मार्फत हे जिवाणू शरीरात प्रवेश करू करतात. ५) बाह्यपरजीवींचे नियंत्रण करण्यासाठी लोकर कापली जाते, त्यासाठी वापरल्या जाणाऱ्या उपकरणामुळे प्राण्यांच्या शरीरावर जखम होऊ शकते, त्या जखमेद्वारे सुद्धा प्रसार होतो. ६) खच्चीकरणाचे ऑपरेशन केले जाते. त्यासाठी लागणारे साहित्य निर्जंतुकीकरण केलेले नसेल तर हे जिवाणू त्या शस्त्रक्रियेदरम्यान शरीरात प्रवेश करतात. ८) बाधित जनावरांच्या खोकल्यातून किंवा जखमेवरील माशीद्वारे या आजाराचा कळपातील इतर निरोगी जनावरांमध्ये प्रसार होऊ शकतो.

जिवाणूंचे शरीरात संक्रमण : - १ ते ३ महिने एवढा दीर्घ असा जिवाणूंचा संक्रमण काळ असतो. जिवाणूंचा प्रसार प्राण्याच्या शरीरात झाल्यानंतर सर्वप्रथम हे जिवाणू लसिका प्रणालीवर प्रादुर्भाव करतात. त्यानंतर जिवाणूची वाढ लसिका ग्रंथीमध्ये होते. मानेजवळ, कानामागे, कासेजवळ, पायाजवळ अशा वेगवेगळ्या शरीराच्या भागावर लसिका ग्रंथी असतात. रोगाचा संसर्ग हा रक्त किंवा लसिका प्रणालीद्वारे संपूर्ण शरीरातील इतर लसिका ग्रंथी किंवा अंतर्गत अवयवांमध्ये (फुफ्फुस, यकृत, मूत्रपिंड इत्यादी) गळू तयार करतात. गळूची हळूहळू वाढ होते. गळूमध्ये पांढरट चिकट पू असतो, ज्याला कोणताही वास नसतो.

आजाराची लक्षणे : १) शरीराच्या लसिका ग्रंथीवर सूज दिसून येते.२) शेळ्या आणि मेंढ्याच्या मानेवर, बाजूंवर आणि कासेवर मोठ्या भरलेल्या गळूच्या स्वरूपात गाठी प्रकट होतात. ३) मुख्यतः मेंढ्यांमध्ये अंतर्गत अवयवांवर गळू विकसित होतात.

मेंढ्यांमधील लक्षणे :

बाह्य स्वरूप :एक किंवा अधिक बाह्य लसिकेच्या गाठींची आकाराने वाढ होते. गाठींमध्ये साधारणतः हिरवट पांढरट चिकट पू असतो. गाठ फुटल्यानंतर त्याला कोणताही वास नसतो, तो कांद्याच्या आवरणासारखा दिसतो. सुरुवातीला गाठ घट्ट असते नंतर मऊ होऊन सुकून जाते.

अंतर्गत स्वरूप : प्रकारामध्ये शरीराच्या विविध संस्था बाधित होतात. अंतर्गत अवयवांमध्ये गळूची निर्मिती होते.

शेळ्यांमधील लक्षणे : बाह्य लसिकेच्या गाठी दिसून येतात. बरे झालेल्या गाठींमुळे कानाखाली उतकांची खपली असू शकते.

उपचार पद्धती : आजाराचे जिवाणू पेशींच्या आतमध्ये तग धरून राहतात, म्हणून उपचारास फारसा प्रतिसाद मिळत नाही. सुरुवातीला गाठी घट्ट असतात. औषध लावून गाठी पिकल्यानंतर त्या आपोआप फुटतात. पूयुक्त स्राव बाहेर येतो. पशुवैद्यकाच्या साह्याने त्यावर उपचार करून घ्यावेत. त्या गाठींमधील सर्व घाण बाहेर काढून घ्यावी. त्यानंतर गाठ जंतुनाशक द्रावणांनी स्वच्छ करावी. १ टक्का पोटॅशिअम परमॅग्नेट या जंतुनाशक द्रावणाने गाठ आणि त्वचेचे निर्जंतुकीकरण करावे. वेदनाक्षमक औषधे, प्रतिजैविकांचा वापर आजारात उपयुक्त ठरतो.

व्यवस्थापन आणि नियंत्रण : १) निरोगी कळपाला वाचविण्यासाठी बाधित जनावरांचे विलगीकरण आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरते. २) वारंवार गोठ्याचे निर्जंतुकीकरण करावे. बाधित गोठ्यात जवळपास दहा महिने तरी नवीन कळपाचा प्रवेश करणे टाळावे. ३) शस्त्रक्रियेदरम्यान होणारा संसर्ग टाळण्यासाठी निर्जंतुकीकरण केलेली उपकरणे व साहित्य वापरावे. ४) आजारी जनावर कळपातून कमी करावे. ५) आजारी जनावर दुसऱ्या पशुपालकास विकू नये

# घरफोडीतील ३ तोळ्याचं गंठण जप्त करून आरोपी अटक

जालना। प्रतिनिधी

सराईत आरोपी जेरबंद करुन ०३ तोळे वजनाचे सोन्याचे गंठण हस्तगत करण्यात आला सदरील कारवाई स्थानिक गुन्हे केली आहे. याप्रकरणी जालना शहरात दिनांक ०८/०६/२०२४ रोजी रात्री दोन वाजेच्या सुमारास अंबड चौफुली भागातील, योगेश नगर येथे एका बंद घराचे लॉक तोडुन अज्ञात आरोपीने कपाटातील सोन्या, चांदीचे व रोख रक्कम चोरी केली होते.

या प्रकरणी पोलीस ठाणे तालुका जालना येथे गुरनं. ३७३/२०२४ कलम ४५७, ३८० भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदरचा गुन्हातील आरोपी शोध घेणेबाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बसंल साहेब यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांनी सुचना



दिल्या होत्या. त्याअनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना सदरचा गुन्हा उघडकीस आणणेबाबत सुचना देवुन मार्गदर्शन केले होते. त्यानुषंगाने दिनांक २०/०८/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार हे नमुद गुन्ह्यातील आरोपी गोपीसिंग प्रल्हादसिंग टाक या गुन्हेगाराचा शोध घेत असतांना तो गांधीनगर येथे मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याकडे गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी केली असता त्याने गुन्हयाची कबुली देवुन गुन्हयात चोरी केलेले ०३ तोळे वजनाचे सोन्याचे गंठण काढून दिले.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि श्री. योगेश उबाळे, सपोनि श्री. शांतीलाल चव्हाण, पोउपनि श्री. राजेंद्र वाघ सोबत पोलीस अंमलदार सैम्युअल कांबळे, कृष्णा तंगे, लक्ष्मीकांत आडेप, सागर बाविस्कर, सुधीर वाघमारे, संदीप चिंचोले, धीरज भोसले, योगेश सहाने, कैलास चेके, सौरभ मुळे सर्व स्थागुशा, जालना यांनी केली आहे.

# माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची जयंती साजरी

बीड। प्रतिनिधी

जिजामाता महिला दुध सहकारी संस्था मर्या. बोरखेडच्या कार्यालया मध्ये किसान काँग्रेस ग्राम शाखा बोरखेड, ता. जि. बीड च्या वतीने स्व: भारतरत्न माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची जयंती साजरी करण्यात आली या प्रसंगी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सचीव शहादेव मारुती हिंदोळे यांनी राजीव गांधी यांचे प्रतीमेस पुष्पहार घालुन पुजन केले.



कार्यक्रमात आपले विचार मांडतांना सांगीतले की, स्व: राजीव गांधी यांचा जन्म २० ऑगस्ट १९४४ रोजी मुंबई येथे झाला ते पायलटची नौकरी करीत होते. त्यांची आई माजी पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांची हात्या दि. ३१ ऑक्टोंबर १९८४ रोजी झाल्यावर त्यांची पंतप्रधान पदावर देशाचे पंतप्रधान झाले. ते सर्वात तरुण वयाच्या ४० व्या वर्षी पंतप्रधान झाले. त्यांनी गांधी, नेहरु परीवाराच्या राजनितीचा अवलंब केला, देशात पहिल्यांदा दुरसंचार, इंटरनेट सुविधेचा अंमल केला ते देशाचे ६ वे पंतप्रधान झाले. त्यांची आज ७९ वी जयंती निमित्त त्यांना अंदरांजली वाहुन आज सदभावना दिन म्हणून साजरा करावा असे सांगतले व उपस्थीतांनी पुष्प वाहुन आदरांजली आर्पन केली या वेळी दुध संस्थेचे चेअरमन सौ. जिजाबाई हिंदोळे, श्रीमती पठाण, सुवर्णा, मेहनतबी, बाबासाहेब अनपट सेवादलाचे विठ्ठल उर्फ नंदकिशोर बोरखेडे, सचीन अनपट, मुबारक पठाण , गायकवाड लाडक्या नेत्याला अदरांजली देणेसाठी मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ हजर होते शेवटी सर्व उपस्थितांचे आभार माणुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# जायकवाडी पाणी मागणी संघर्ष समितीची जनसंवाद यात्रा



अंबड । प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील अवर्षण प्रवन ताडहादगाव, पारनेर, रोहिलागड, जामखेड जिल्हा परिषद सर्कल व अंबड शहरास जायकवाडी धरणातून पाणी मिळावे यासाठी जायकवाडी धरण पाणी मागणी संघर्ष समितीच्यावतीने जनसंवाद यात्रेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती समितीचे अध्यक्ष अँड.शामसुंदर पाटील यांनी आज दि.२१ बुधवार रोजी आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी समितीचे सदस्य उपस्थित होते.

पुढे बोलतांना अँड.पाटील म्हणाले की, दिवसेंदिवस तालुक्यातील पर्जन्यमान कमी होवून शेती ओस पडत आहे परिणामी शेतकरी हवालदिल झाल्याने जनजीवन विस्कळीत झालेले पहायला मिळते. दिवसेंदिवस परिस्थिती अत्यंत वाईट होत असुन त्याचा परिणाम स्थानिक बाजारपेठ, आठवडी बाजारावरही झालेला दिसून येत आहे.

या जनसंवाद यात्रेचा शुभारंभ दि.२३ ऑगस्ट रोजी सकाळी ७. वा. श्री. मत्स्योदरी देवी मंदिर येथून होईल त्यानंतर पुढे ही यात्रा स.९ वा. डावरगाव ,स. ११ वा. पावसेपांगरी, दु.१. वा. कवडगाव , दु.०४ वा, दहिगव्हाण ,साय.०५ वा. बनगाव तर संध्या. ६ वा. ताडहादगाव येथे यात्रेचा मुक्काम राहील.दुसऱ्या दिवशी दि. २४ ऑ.रोजी स.८ वा. ढालसखेडा, स.९ वा. पराडा, दु. १२ वा. दहिपुरी , दु.०५ वा.दुधपुरी फाटा, सायं. ०६ वा. पानेगाव मुक्कामी राहील.तिसऱ्या दिवशी दि. २५ ऑ. स.८ वा. वाघलखेडा फाटा, स.९ वा. सारंगपुर, दु. १२ वा. हरतखेडा , दु.०१ वा. शेवगा, सायं. ०५ वा. धनगरपिंप्री, सायं.०६ वा. हस्तपोखरी मुक्कामी राहील.चौथ्या दिवशी दि.२६ ऑ. रोजी ही यात्रा स.८ वा. कर्जत, स.११ वा. लो. भायगाव, दु.०३ वा. खेडगाव , दु.०४ वा. देशगव्हाण, सायं. ०५ वा. मा. भायगाव, संध्या. ०६ वा. रोहिलागड मुक्कामी राहील.पाचव्या दिवशी ही यात्रा स.११ वा. किनगाव चौफुली, दु.०१ वा. जामखेड, स.८ वा. किनगाव, दु.०५ वा. पिंपरखेड,सायं ०६ वा.चिचंखेड येथे मुक्काम राहिल. सहाव्या दिवशी दि. २७ ऑ. दि.२८ ऑगस्ट रोजी स.८. वा. शिरनेर त्यानंतर स.०९. वा. अंबड शहरात आगमन व स.०९. ते ११.दरम्यान ही यात्रा अंबड शहरातील कोर्ट रोड मार्गे,महाराष्ट्र व्दार,महात्मा ज्योतीबा फुले चौक ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ,बस स्टॅण्ड मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक जाऊन पं.गोविंदराव जळगावकर नाट्यगृह येथे या जनसंवाद यात्रेचा समारोप होईल अशी माहिती समितीचे अध्यक्ष अँड. शामसुंदर पाटील यांनी यावेळी दिली.या प्रसंगी रविंद्र गोल्डे, चंद्रशेखर मोहरीर, समद बागवान, हनुमान धांडे, बालासाहेब इंगळे,शिवप्रसाद चांगले, दिनेश काकडे,सिध्दार्थ रोटे, गोवर्धन भोरे,जाकेर डावरगावकर,रामभाऊ लांडे, लक्ष्मण गाडेकर,राजीव डोंगरे,बंडु पागीरे,अय्युब बागवान, अमोल आढावे सह जायकवाडी पाणी मागणी संघर्ष समितीच्या सदस्यांची उपस्थिती होती.

# प्रलंबीत तसेच दाखलपूर्व प्रकरणे राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये सुनावणीसाठी ठेवा

## २८ सप्टेंबरला होणार लोक अदालत-सोनी

बीड। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे निर्देशानुसार दिनांक २८ सप्टेंबर २०२४ रोजी बीड जिल्हा न्यायालय व सर्व तालुका न्यायालयामध्ये मा.श्री.आनंद एल.यावलकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश बीड तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांचे मार्गदर्शनाखाली लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर लोकन्यायालयांमध्ये प्रलंबित असलेली प्रकरणे आणि दाखल पूर्व प्रकरणे सुनावणीसाठी लोक अदालतीमध्ये ठेवता येतील. संबंधित पक्षकारांनी आपल्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी येत्या २८ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित केलेल्या लोकअदालतीमध्ये आपले प्रकरणे तडजोडीसाठी ठेवावे असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव तथा दिवाणी न्यायाधीश व.स्तर श्री.जी.जी.सोनी यांनी केले आहे.

या पूर्वी दिनांक २७ जुलै २०२४ रोजी झालेल्या लोकन्यायालयामध्ये संपूर्ण बीड जिल्हयातून प्रलंबीत व दाखलपूर्व असे एकूण ६०५३२ प्रकरणे ठेवण्यात आली होती त्यापैकी ४१७७ प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली. यामध्ये जवळपास १७ कोटी रूपयांच्या प्रकरणामध्ये तडजोड झाली. सदरचे लोकन्यायालय यशस्वी करण्याकरिता जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष व पदाधिकारी, विधिज्ञ तसेच सर्व तालुका वकील संघाचे अध्यक्ष, पदाधिकारी, विधिज्ञ यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

त्याप्रमाणे येणा-या २८ सप्टेंबर २०२४ रोजी होणा-या लोकन्यायालयाबाबत बोलताना न्यायाधीश जी.जी.सोनी म्हणाले की, लोक अदालतच्या निवाड्याविरूध्द अपील नाही, एकाच निर्णयात कोर्टबाजीतून कायमची सुटका होते, खटल्यांमध्ये साक्षी पुरावा, उलटतपासणी, दीर्घ युक्तीवाद या बाबी टाळल्या जातात. निकाल झटपट लागतो, लोक अदालतीत होणारा निवाडा हा आपसात समजूतीने होत असल्याने कुणाची हार वा जीत होत नाही. लोक अदालतीचा निवाडा दोन्ही पक्षांना समाधान देतो, परस्पर संमतीने निकाल होत असल्याने एकमेकांतील व्देष वाढत नाही व कटुताही निर्माण होत नाही. कोर्टाच्या हुकुमनाम्याप्रमाणे लोक अदालतीत होणा-या निवाडयाची अंमलबजावणी कोर्टामार्फत करता येते, वेळ पैसा यांची बचत होते, इतकेच नव्हे तर लोक अदालतीत निकाली निघणा-या प्रकरणांमध्ये कायद्यानुसार कोर्ट फीची रक्कम परत मिळते. आपली प्रलंबित तसेच दाखल व्हावयाचे आहेत अशी प्रकरणे लोक अदालतीमध्ये सुनावणीसाठी ठेवण्याकरता संबंधित न्यायालयातील तालुका विधी सेवा समिती अथवा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा आणि लोक अदालतीमध्ये सहभागी होउन आपले वाद सामोपचाराने कायमचे मिटवावेत असे आवाहन न्यायाधीश श्री.जी.जी.सोनी यांनी केले आहे.

# एमबीबीएसचे विद्यार्थी स्कॉलरशिपपासून वंचित

## महा डीबीटी स्कॉलरशिप पोर्टल पुन्हा सुरु करा -अँड. जाधव

पाटोदा । प्रतिनिधी

एमबीबीएस चे विध्यार्थी शिक्षणासाठी स्कॉलरशिपचा लाभ घेण्यासाठी महा डीबीटी पोर्टलद्वारे अर्ज करतात. परंतु महा डीबीटीचे पोर्टल सप्टेंबर ते ऑक्टोंबर पर्यंत सुरु असते. सदरील पोर्टल या वर्षी १५ जुलै २०२४ ला बंद करण्यात आले. त्यामुळे राज्यातील बऱ्याच विध्यार्धाना स्कॉलरशिपचा लाभ घेण्यापासून वंचित राहावे लागले आहे. यामुळे वंचित विद्यार्थ्यांना लाभ मिळावा यासाठी महा डीबीटी पोर्टल पुन्हा सुरु करावे अशी मागणी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विधी सेलचे विभागप्रमुख अँड. नरसिंह जाधव यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे

एमबीबीएस चे विध्यार्थी शिक्षणासाठी स्कॉलरशिपचा लाभ घेण्यासाठी महा डीबीटी पोर्टलद्वारे अर्ज करतात. परंतु महा डीबीटीचे पोर्टल सप्टेंबर ते ऑक्टोंबर पर्यंत सुरु असते. सदरील पोर्टल या वर्षी १५ जुलै २०२४ ला बंद करण्यात आले. त्यामुळे राज्यातील बऱ्याच विध्यार्धाना स्कॉलरशिपचा लाभ घेण्यापासून वंचित राहावे लागले आहे . तसेच पुरवणी परीक्षेचा निकाल २८ जून २०२४ रोजी लागला असून सदर विध्यार्थ्यांना सुद्धा स्कॉलरशिप पासून वंचित रहावे लागले आहे. करिता महा डीबीटी स्कॉलरशिप पोर्टल पुन्हा सुरु करावी अशी एम बी बी एस च्या विद्यार्थ्यांनी मागणी केली आहे. एम बी बी एस विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता व त्यांना शैक्षणिक कालावधी स्कॉलरशिपचा लाभ घेण्यासाठी महा डीबीटी स्कॉलरशिप पोर्टल पुन्हा सुरु करण्यात यावी अशी मागणी अँड. नरसिंह जाधव यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.

# वसंतदादा पाटील महाविद्यालयात नवमतदार नोंदणी उत्साहात सुरु

पाटोदा । प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २२ ऑगस्ट रोजी नवमतदारांची नावनोंदणी उत्साहात सुरु करण्यात आली.

महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. उद्घाटनप्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रोफेसर काकासाहेब पोकळे, लोकप्रशासन विभागप्रमुख डॉ. शरद पवार, डॉ. विनोदचंद्र पवार, डॉ. रामचंद्र पवार, प्रा. गणेश बनकर, प्रा. दिनेश शिंदे, डॉ. जालिंदर लोणके, डॉ. कृष्णा नागरे, प्रा. कुलदीप सानप, प्रा. अजिंक्य साखरे उपस्थित होते. याप्रसंगी नवमतदार नोंदणी कक्षात विद्यार्थ्यांचे नावनोंदणी फॉर्म व कागदपत्रे स्विकारण्यात आली.

# रामभाऊ गव्हाणे यांचे निधन

बीड । प्रतिनिधी



केज तालुक्यातील बोरगाव बुद्रुक येथील जेष्ठ वारकरी रामभाऊ विठ्ठल गव्हाणे उर्फ तात्या यांचे बुधवार २१ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी ७ वाजुन २५ मिनीटांनी राहत्या घरी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थीवावर गावातील स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, भावजई, पुतण्या असा परिवार आहे. मृत्यूसमयी त्यांचे वय ८६ वर्षाचे होते.शेतकरी कुटूंबातील रामभाऊ गव्हाणे यांनी ४५वर्ष पंढरपूरच्या विठुरायाची वारी केली होती.देहु येथुन निघणाऱ्या संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यात सलग ३० वर्ष तर परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यातील बाभळगाव येथील निवृत्ती चोपदार दिंडीत सलग १५ वर्ष त्यांनी वारी केली.त्यांच्या निधनाने बोरगाव गावावर शोककळा पसरली असुन जुन्या पिढीतील जेष्ठ वारकरी हरवला आहे.

# रॅगिंग प्रतिबंधक कायद्याची जनजागृती

बीड । प्रतिनिधी

आज दिनांक २२ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११००: वाजता किमान समान कार्यक्रमाअंतर्गत आनंद एल. यावलकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली ''रॅगिंग प्रतिबंधक अधिनियम १९९९'' या विषयी शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय, बीड येथे जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमात महाराष्ट्र राज्यात शैक्षणिक संस्थांमध्ये रॅगिंग प्रतिबंधक अधिनियम १९९९ या विषयावर बोलताना जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव जी. जी. सोनी साहेब यांनी उपस्थित विद्याथ्र्यांना या कायदयाविषयी माहिती




सांगितली. विद्याथ्र्यांनी शैक्षणिक संकुलात आपले भविष्य घडवण्यासाठी यावे कोणाचे आयुष्य बिघडवण्यासाठी नाही. विद्याथ्र्यांनी त्यांच्या हुशारीचा, त्यांच्या ताकतीचा, संपत्तीचा उपयोग वंचित मानसांना बळ देण्यासाठी करावा असे अवाहन यांनी केले.

सदरील कार्यक्रमात बालकल्याण समिती, बीड चे अध्यक्ष श्री. अशोक तांगडे यांनी महाराष्ट्र राज्यात शैक्षणिक संस्थांमध्ये रॅगिंग प्रतिबंधक अधिनियम १९९९ या कायद्याविषयी सविस्तर मार्गदर्शन करताना विद्याथ्र्यांना सांगितले की, शैक्षणिक संस्था या आपले आयुष्य घडवण्यासाठी असतात. या संस्थेमध्ये येऊन सर्व विद्याथ्र्यांनी ज्ञानअर्जन करण्याचे काम करावे असे अपेक्षित आहे. पण काही वर्षापूर्वी उच्च शिक्षणामध्ये मोठ्या प्रमाणात रॅगिंग वाढल्यामुळे महाराष्ट्र शासनाला हा कायदा करावा लागला. या कायद्याच्या कचाट्यात कोणी सापडले तर दोन वर्षाचा कारावास व पाच वर्ष कोठेही शैक्षणिक संस्थेत प्रवेश दिला जात नाही. त्यामुळे कोणत्याही विद्याथ्र्यांनी रॅगिंग करू नये असे अवाहन अशोक तांगडे यांनी केले. तसेच शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. एम.आर. लोहोकरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तर कार्यक्रमाचे संचालन संगणक विभागाचे प्रमुख श्री. एस.बी. वीर यांनी केले. सदर कार्यक्रमाला शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे विद्याथ्र्यी मोठ्या संखेने उपस्थित होते.

# आज बालकीर्तनकार सोहम महाराज सातपुते यांचे किर्तन

बीड । प्रतिनिधी

येथील बार्शी नाका इथून जवळच असलेल्या कानिफनाथ नगर इमामपूर रोड बीड येथेदि २०/८/२४ मंगळवारपासूनअखंड हरिनाम सप्ताहस सुरूवात झाली आहे.उद्या दि.२३ ऑगस्ट रोजी रात्री ८ ते १० या वेळेत बालकीर्तनकार ह.भ.प.सोहम महाराज सातपुते यांचे हरिकिर्तन होणार आहे. तरी या कीर्तनाचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन कानिफनाथ नगर ग्रामस्थ व अखंड हरिनाम सप्ताह कमिटी यांनी केले आहे..



# परळी व आष्टी येथे होणाऱ्या कृषी महोत्सवाचे स्वागत

## पण त्या मध्ये हमी भाव आणि विमा कंपनींचे स्टॉल असावे-भाई घोलप

पाटोदा । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात परळी येथे २१ ऑगस्ट पासून कृषी महोत्सव तसेच आष्टी येथे २९ ऑगस्ट पासून कृषी प्रदर्शन होत आहे. त्या साठी बीड जिल्ह्यातील शेतकरी कामगार पक्ष दोन्ही आयोजकांचे स्वागत करत आहे. परंतु शेतकऱ्यांना हमी भावाबद्दल माहिती आणि विमा कंपनी बद्दल माहिती देणारे स्टॉल(कार्यालय) असावेत तरच कृषी महोत्सव आणि कृषी प्रदर्शनाचा खरा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहचेल असे मत आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी व्यक्त केले.

जिल्ह्यातील पुर्वेकडे कृषी मंत्र्यांच्या विधानसभा मतदार संघात राज्यस्तरीय कृषी महोत्सव होत आहे. तर बीड जिल्ह्याच्या पश्चिमेकडे माजी आमदार यांच्या पुढाकारातुन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन होत आहे. या कार्यक्रमामुळे शेतकरी आणि शेतीला जोडधंदा असणाऱ्या समुहाचे फायदे होतील असे आयोजकांना वाटत आहे. त्यांचे आम्ही शेकापच्या वतीने स्वागत करतो. परंतु त्या कृषी महोत्सव किंवा प्रदर्शनात शेतकऱ्यांच्या हमी भावासाठी माहिती कार्यालय(स्टॉल) असल्यास शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर हमी भाव कसा देण्यात येतो याची सविस्तर माहिती शेतकऱ्यांना मिळेल. आज उदा.दाखल सोयाबीन चा विचार केला तर सोयाबिनचा उत्पादन खर्च किती? कोणत्या कृषी विद्यापिठाने तो तयार केला त्यांनी राज्याच्या कृषीमुल्य आयोगाकडे केंव्हा पाठविला आणि राज्यकृषी मुल्य आयोगाने राष्ट्रीय कृषी मुल्य आयोगाकडे केंव्हा पाठविण्यात येतो. केंद्रीय स्तरावर हमी भाव ठरविण्याचे अधिकार कोणाला, शासनाच्या हमी भावापेक्षा बाजारात कमी भाव शेतकऱ्यांना मिळत असल्यास त्या वर शासन नेमके काय करणार, जर शासनाने हमी भावाने खरेदी चालु केली तर त्या वर २४ तासाच्या आत पैसे देण्याची तयारी राज्य किंवा केंद्र शासनाकडे आहे काय? तशी अर्थ संकल्पात तरतुद करण्यात आली आहे काय? आज सोयाबीनच्या हमी भावापेक्षा



७०० ते ८०० रुपयांनी सोयाबिन कमी भावाने बाजारत विकले जात आहे. या वर शासन काय करत आहे याची माहिती शेतकऱ्यांना मिळणे गरजेचे आहे. तसेच प्रधानमंत्री पीक विमा योजना या वर विमा कंपनी आपल्या जिल्ह्यासाठी कोणती, तिचे नाव, त्यांचे कार्यालय कृषी प्रदर्शनात किंवा महोत्सवात असावे जेणे करुन शेतकऱ्यांना याची माहिती मिळेल. उदारणार्थ सांगायचे झाल्यास बीड जिल्ह्यात २०२३-२४ चा खरीप हंगाम ८० ते ९०% कमी पावसामुळे वाया गेला. त्या वर कृषीमंत्री म्हणत आहेत की, ४०० कोटी विमा आपणाला मिळतोय. बीड साठी असणाऱ्या अग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनीने सुरवातीला २५% अग्रीम म्हणून विमा काही शेतकऱ्यांना दिला परंतु पालकमंत्री यांनी आपला बीड जिल्हा दुष्काळात आहे असे जाहीर केले होते. विमा कंपनीने प्रत्येक पिकाचे उंबरठा उत्पादन किती दाखविले ? बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कोणत्या पिकाला किती टक्के विमा दिला किंवा देणार या बद्दल गेल्या वर्षभरापासून शेतकऱ्यांना माहिती मिळत नाही. १(एक) रुपयात शेतकऱ्यांचा विमा भरुन घेतल्या जातो त्या मध्ये राज्य शासनाचा भार किती व केंद्र शासनाचा हिस्सा किती राज्य व केंद्राचे एकूण किती रुपये कंपनीला मिळाले याची सविस्तर माहिती शेतकऱ्यांना मिळण्यासाठी कृषी महोत्सवामध्ये किंवा कृषी प्रदर्शनात विमा कंपनीचे माहिती कार्यालय असावे. ई-पीक पहाणी मध्ये ७० ते ८० टक्के शेतकऱ्यांना स्वतः सहभाग नोंदवता येत नाही. पिकाचे नुकसान झाले तरी विमा कंपनी ७२ तासाच्या आत आणि ई-पिक पहाणी शिवाय तक्रार घेत नाही. तसेच कृषी महोत्सवात पशु संवर्धन विभागाचे माहिती कार्यालय असावे आज बीड जिल्ह्यात जनावरांच्या दवाखान्यात संडासची सुध्दा गोळी किंवा जखम झाल्यास आयोडिन औषधही मिळत नाही असे एक नाही तर अनेक विषय आपल्या समोर मांडता येतील असे शेकापचे भाई विष्णुपंत घोलप यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना मत व्यक्त केले.


## जाहीर प्रगटन

**मा.श्री आर. जी. बागडे साहेब, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ११९०/२०२४ मंगल विरूध्द निरंक**

अर्जदार : १. मंगल भ्र. बाबासाहेब मिसाळ, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम, रा. विश्वेश्वर कॉलनी भक्ती कन्ट्रक्शन, बीड, ता.जि. बीड. २. सुरज पि. बाबासाहेब मिसाळ, रा. विश्वेश्वर कॉलनी 'भक्ती कन्ट्रक्शन, बीड, ता.जि.बीड. वय २९ वर्षे, धंदा खाजगी नौकरी, ३. पवनकुमार पि. बाबासाहेब मिसाळ, वय- २४ वर्षे, धंदा शिक्षण, रा. विश्वेश्वर कॉलनी भक्ती कन्ट्रक्शन, बीड, ता.जि.बीड. ४. हौसाबाई भ्र. निवृत्ती मिसाळ, वय ८१ वर्षे, धंदा घरकाम, रा. उक्कडपिंप्री, ता. गेवराई जि.बीड. ह.मु.विश्वेश्वर कॉलनी भक्ती कन्ट्रक्शन, बीड, ता.जि.बीड.

**विरुध्द निरंक**

मागणी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत कै. बाबासाहेब निवृत्ती मिसाळ मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी मयत कै. बाबासाहेब निवृत्ती मिसाळ यांचा मृत्यु दिनांक २७/०७/२०२४ रोजी झाला आहे. वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत कै. बाबासाहेब निवृत्ती मिसाळ यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत कै. बाबासाहेब निवृत्ती मिसाळ यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक २१/०८/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयायचे शिक्कयाने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०४/१०/२०२४ आहे.

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर, बीड.

# राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाची कृषिमंत्री धनंजय मुंडेकडून पाहणी

## शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त व मार्गदर्शक बाबी उपलब्ध, शेतकरी बांधवांनी लाभ घ्यावा – धनंजय मुंडे

**परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी**

राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात प्रथमच परळी येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय कृषी महोत्सव अंतर्गत भरवण्यात आलेल्या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनास कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी उद्घाटन समारंभ संपल्यानंतर भेट देऊन पाहणी केली.

कृषी क्षेत्रात लागलेले नवनवीन शोध, नवनवीन तंत्रज्ञान, नवीन आधुनिक अवजारे यांसह विविध शेती उत्पादने आदींची शेकडो दालने (स्टॉल्स) उभारण्यात आली असून नॅनो खतांची ड्रोन द्वारे फवारणी करण्याची प्रात्यक्षिके सुद्धा येथे दाखवण्यात येत आहेत. या स्टॉल्सला भेटी देण्यामध्ये कृषिमंत्री धनंजय मुंडे हे तब्बल साडेतीन तास रमले होते. जवळपास ७.३० ते ११ वाजेपर्यंत या वेळेत त्यांनी जवळपास ३३५ स्टॉल्सला भेटी देऊन पाहणी केली व त्यांच्याकडील उत्पादनांची व तंत्रज्ञानाची माहिती घेतली. चारही कृषी विद्यापीठाचे स्टॉल्स या ठिकाणी उभारले असून, तेथील उपक्रमांचीही मुंडेंनी माहिती घेतली.





साडेतीन तास कृषीमंत्री रमले स्टॉल्स पाहण्यात, ३३५ स्टॉल्सला दिल्या भेटी

या कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून लावण्यात आलेल्या स्टॉल्समध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने शेती करण्यासाठी आणि शेतीमध्ये अधिक समृद्धी आणण्यासाठी अत्यंत उपयुक्त आणि मार्गदर्शक बाबी शेतकऱ्यांसाठी उपलब्ध असून राज्यभरातील शेतकरी बांधवांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी व लाभ मिळवावा, असे आवाहन याप्रसंगी धनंजय मुंडे यांनी केले आहे. यावेळी विभागीय कृषी सहसंचालक श्री.मुळे, आत्माचे जिल्हा प्रकल्प संचालक सुभाष साळवे यांसह अधिकाऱ्यांनी श्री मुंडे यांना माहिती दिली. प्रसंगी पदाधिकारी व कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी शेतकऱ्यांना ड्रोनद्वारे फवारणीची प्रात्यक्षिके दाखवण्यात आली, त्यालाही शेतकरी बांधवांचा मोठा प्रतिसाद लाभला. हा उपक्रम पुढील चारही दिवस अविरत सुरू राहणार आहे.

### स्टॉल ठिकाणीच धनंजय मुंडे यांचा नाश्ता

काल सकाळपासूनच कार्यक्रमाची लगबग होती. सायंकाळी उशिरापर्यंत जेवणालाही वेळ मिळाला नाही, त्यामुळे सायंकाळी स्टॉल पाहत असतानाच धनंजय मुंडे यांनी स्टॉलवर असलेले विविध मिलेटपासून तयार केलेले खाद्यपदार्थ, फळे यांचा शेतकऱ्यांच्या सोबत आस्वाद घेतला.

# वक्फ बोर्डाच्या माध्यमातून उपेक्षित वंचितांना न्याय देणार – समीर काझी

## रोटरी क्लब, क्रेडाई, बागवान बिरादरी पंचकमिटी, काझी सेवा संघ यांच्या वतीने नागरी सत्कार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

वक्फ बोर्डाच्या माध्यमातून समाजातील वंचित व उपेक्षित यांच्यासाठी विविध योजना राबवून त्यांना न्याय देण्या बरोबरच वक्फ बोर्डाचा दर्जा उंचावण्यासाठी आपण प्रामाणिकपणे काम करू. अशी ग्वाही महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य हज कमिटीचे नवनिर्वाचित सदस्य समीर गुलामनबी काझी यांनी दिली.

अंबाजोगाईत बुधवारी आद्यकवी मुकुंदराज सभागृहात रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी ,क्रेडाई,बागवान बिरादरी पंचकमीटी, काझी सेवा संघ यांच्या वतीने वक्फ मंडळाचे अध्यक्ष समीर काझी यांच्या नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सत्काराला उत्तर देताना समीर काझी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र क्रेडाईचे अध्यक्ष प्रमोद खैरनार होते. तर प्रमुख अतिथी म्हणून रोटरीचे माजी प्रांतपाल ओमप्रकाश मोतीपवळे, बागवान एज्युकेशन सोसायटीचे सचिव हाजी नसीर




अहेमद खलिफा, काझी सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष मोहंम्मद शफि गुलामनबी काझी, क्रेडाईचे महाराष्ट्र सचिव डॉ.धर्मविर भारती, रोटरी क्लबचे अध्यक्ष कल्याण काळे, सचिव धनराज सोळंकी,क्रेडाई

अंबाजोगाईचे अध्यक्ष संजय सुराणा, सचिव शेख शकील बागवान, अतुल संघाणी, अनंत लोमटे, प्रा.संतोष मोहिते उपस्थित होते. यावेळी बोलताना समिर काझी म्हणाले की, आपण वक्फ बोर्डाच्या अध्यक्षपदाचा पदभार घेतल्यापासुन २० कोटी रूपयांचा निधी शासनाकडून बोर्डासाठी प्राप्त केला आहे. बोर्डाच्या माध्यमातून २७ जिल्ह्यामध्ये मंडळाची जिल्हा कार्यालये उघडण्यात येत आहेत. मंडळाच्या रेकॉर्ड रूमचे आधुनूकीकरण करण्यात येणार आहे. छत्रपती संभाजीनगर येथे आमखास मैदानात १०० कोटी रूपयांचे अंतरराष्ट्रीय स्टेडीअम बनविण्यासाठी माझा पुढाकार राहिल. तर वक्फ बोर्डाचे मेडीकल कॉलेज निर्माण करण्यासाठी माझा प्रयत्न राहिल. वक्फ बोर्डाच्या माध्यमातून समाजातील विधवा स्त्रीया, गरीब विद्यार्थी यांच्यासाठी विविध योजना तरूण उद्योजकांना भांडवल देण्याचा प्रस्ताव विचाराधिन असल्याचे समीर काझी यांनी यावेळी सांगितले. अध्यक्षीय समारोप प्रमोद खैरनार यांनी केला. तर यावेळी ओमप्रकाश मोतीपवळे, हाजी नसीर अहेमद खलिफा, मोहम्मद शफी गुलामनबी काझी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी समीर काझी यांचा नागरी सत्कार शाल, श्रीफळ, सन्मानपत्र व स्मृती चिन्ह देवून करण्यात आला. सन्मानपत्राचे वाचन अतुल संघाणी यांनी केले. या कार्यक्रमात नीट परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय सुराणा यांनी केले. संचलन संतोष पवार यांनी, तर उपस्थितांचे आभार शेख शकील बागवान यांन मानले. या कार्यक्रमास नागरीकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# ऑस्ट्रेलियातल्या मेलबर्नमध्ये तुतारीचा आवाज ! नारायण डक यांच्या हितचिंतकांचा पुढाकार

**माजलगाव । प्रतिनिधी**

शरदचंद्र पवार पक्षाच्या तुतारीचा आवाज ऑस्ट्रेलियातील मेलबर्न आणि ब्रिसबेन सिटीतील रस्त्यावर दिसून आला. यासाठी पक्षाचे माजलगाव विधानसभा अध्यक्ष नारायण डक यांच्या हितचिंतकांनी पुढाकार घेतल्याचे दिसून आले.



राज्यामध्ये लवकरच विधानसभेच्या निवडणुका जाहीर होणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणावर राजकीय हालचाली सुरू असून, सगळेचजण आपापल्या पद्धतीने प्रचाराला लागले आहेत. लोकसभेमध्ये मोठे यश मिळाल्याने शरद पवार यांच्या शरदचंद्र पवार पक्षाची सध्या मोठी क्रेझ झाली आहे. महाराष्ट्रामध्ये विधानसभेत या पक्षाला मोठे यश मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. स्वतः शरद पवार हे निवडणुकीच्या आढाव्यासोबतच उमेदवारांची चाचपणी करताना दिसत आहेत. त्यांच्या पक्षाचे तुतारी हे चिन्ह असून, ही तुतारी हाती घेण्यासाठी राज्यातील अनेकजण आतुर झाले आहेत. आता तर या तुतारीचा डंका थेट ऑस्ट्रेलियातील मेलबर्न आणि ब्रिसबेन शहराच्या रस्त्यावर दिसून आला. शरदचंद्र पवार पक्ष आणि तुतारी यावर आधारित असलेले गीत आणि सोबतीला शरद पवार यांचे फोटो असलेले पोस्टर मेलबर्नच्या रस्त्यावर फिरताना पाहून तेथील नागरिकांना कौतुक वाटत होते आणि ते याकडे आश्चर्याने पाहत असल्याचे दिसले. पक्षाचे माजलगाव विधानसभा अध्यक्ष नारायण डक यांच्या मेलबर्न येथील हितचिंतकांनी शहराच्या रस्त्यावर जाहीरपणे ही मिरवणूक काढली. राज्यासह विदेशातही तुतारी वाजत असल्याने आता महाराष्ट्रामध्ये सत्तेत येण्यापासून तुतारीला कोणीही रोखू शकणार नाही अशा भावना, शरद पवार यांच्या नेते आणि कार्यकर्त्यांकडून व्यक्त होताना दिसत आहेत.

# कुंडलिक खांडेच्या जामीनावर २८ ऑगस्टला होणार निर्णय

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर खांडे हल्ला प्रकरणात मागील दोन महिन्यापासून न्यायालयीन कोठडीत असलेल्या कुंडलिक खांडे यांच्या जामिनावर गुरूवारी देखील निर्णय होऊ शकला नाही.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्या.शिवकुमार डिगे यांनी गुरूवारी सर्व बाजूंचा युक्तीवाद ऐकून घेतला असून हे प्रकरण निर्णयासाठी राखून ठेवले आहे. न्यायालय या प्रकरणात २८ तारखेला निर्णय देणार आहे.

शिवसेना उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर खांडे यांच्यावरील प्राणघातक हल्ला प्रकरणात दोन महिन्यापूर्वी तत्कालीन शिवसेना जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांना अटक करण्यात आली होती. सुरूवातीच्या पोलिस कोठडीनंतर सुमारे दीड महिन्याहून अधिक



काळापासून कुंडलिक खांडे न्यायालयीन कोठडीत आहेत. बीडच्या सत्र न्यायालयाने खांडे यांची जामीन फेटाळल्यानंतर त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात धाव घेतली होती. या प्रकरणात न्या.शिवकुमार डिगे यांच्यासमोर सुनावणी सुरू आहे. मागील तारखेला न्यायालयाने सरकार पक्ष आणि याचिकाकर्त्याचे म्हणने ऐकले होते. त्यानंतर गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या आधारावर जामीन नाकारता येतो का? या विषयावरील युक्तीवादासाठी गुरूवार (दि.२२) ची तारीख निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार आज या प्रकरणात सुनावणी झाली. दोन्ही बाजूंनी उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निकालांचे दाखले दिले गेले. तर मुळ फिर्यादी ज्ञानेश्वर खांडे यांच्या वतीने आरोपीला जामीन मिळाल्यास ते फिर्यादीवर दबाव आणण्याची शक्यता आहे. यापूर्वी अनेकदा तसे प्रकार घडले आहेत. त्यामुळे जामीन देऊ नये अशी भूमिका मांडण्यात आली. सर्व बाजूंचे युक्तीवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने या प्रकरणावरचा निर्णय राखुन ठेवला असून तो बुधवार दि.२८ रोजी दिला जाणार आहे. त्यामुळे आता आणखीन सहा दिवस तरी कुंडलिक खांडेंना कारागृहातच काढावे लागतील.

# एस टी महामंडळाच्या मनमानी कारभारामुळे विद्यार्थ्यांचे शालेय जीवन वाऱ्यावर

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यात खेडोपाडी धावत असणारी बस सेवा म्हणजे अमावस्या पौर्णिमेला वेळेवर धावते का काय? अशी एक शंकाच उपस्थित होते ती म्हणजे जवळपास कॉलेज,शाळा नसल्याकारणाने खेडोपाड्यातुन सर्व विद्यार्थी हे कडा शहरात येऊन शिक्षण घेतात परंतु अशा एस टी महामंडळाच्या भोंगळ्या कारभार व चालक वाहकांचा उद्धटपणा अन्? चालकांची गाडी चालवताना बघायला मिळणारी हिरोगीरी यामुळे पॅसेंजर विद्यार्थ्यांच्या ही भविष्यावर एक प्रश्न चिन्ह उभा राहत आहे विशेष म्हणजे आष्टी ते सावरगाव व आष्टी नगर अंभोरा या मार्गावरची बस सेवा ही तर ...कधीच वेळेवर येत नाही हात धाखवा गाडी थांबवा हे शासनाने राबविलेले नियम जो

### चालक वाहकांचा पॅसेंजरशी उद्धटपणा

विद्यार्थींना सेवा घेता येईल असा नियम सुद्धा एस टी चालक वाहकांनी धाब्यावर बसवल्याचे निदर्शनास येते जेथे बसला स्टॉप आहे परंतु तेथे ही बस थांबवली जातं नसल्याने विद्यार्थी वर्गातुन नाराजगीचा सुर येतं आहे व बस कधी येईल किंवा खुप उशीर झाला असा चालक वाहकांना सवाल करताच त्यांचे उद्धटपणे बोलणे ऐकून घ्यावे लागतील अशा या एसटी महामंडळाच्या आणि भोंगळ्या कारभाराला सर्वसामान्य त्रासुन जात आहे एस टी महामंडळातल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे विशेष लक्ष देऊन विद्यार्थ्यांची अडचण सोडावी अशी मागणी पालक वर्गासह विद्यार्थ्यांकडून होतं आहे.

# लाचखोर मंडळाधिकारी सानपला पोलीस कोठडी

बीड । प्रतिनिधी

कमी उत्खनन दाखविण्यासाठी एक लाखाची लाच घेताना अटक करण्यात आलेल्या मंडळाधिकारी सचिन सानपला एक दिवसाची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.द्वितीय न्यायाधीश व्ही.एच पटवदकर यांच्या न्यायालयाने हा निर्णय दिला .

बीडचा मंडळाधिकारी सचिन सानप याला बुधवारी एसीबीने एक लाखाची लाच घेताना अटक केली होती. त्याच्या विरोधात शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.त्याला गुरूवारी बीडच्या न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी न्यायालयाने त्याला शुक्रवार (दि.२३) पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

# नराधमांना कठोर शिक्षा करण्याची शिवसेनेकडून मागणी



**कडा । प्रतिनिधी**

येथे शाळेत दोन चिमुरड्या मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या निषेधार्थ शिवसेना (उबाठा) च्या वतीने आष्टीत तहसीलदार बाळदत्त मोरे यांना निवेदन देऊन या घटनेतील अत्याचारी नराधमांना कठोर शिक्षा करण्याची शिवसेनेकडून मागणी करण्यात आली.

आष्टी येथे उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेकडून बदलापूर येथील शाळेत चिमुकलीवर झालेल्या अमानवी अत्याचाराचा निषेध करुन तहसीलदांना निवेदन देऊन नराधमाला फाशी देण्याची मागणी करण्यात आली. तसेच राज्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यात अपयशी ठरलेल्या गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही राजीनामा द्यावा. अशी मागणी शिवसेनेकडून करण्यात आली. याप्रसंगी शिवसेना तालुकाप्रमुख सुभाष राऊत, उपतालुकाप्रमुख अक्षय साप्ते, संघटक ज्ञानदेव मुटकुळे, सोमनाथ खिळे, विद्यार्थी सेनेचे शिवप्रसाद जाधव, बापुराव काळे, साईनाथ पाखरे, रामदास मोहिते, शिवाजी थोरवे,अब्रान शेख इत्यादी शिवसैनिक उपस्थित होते.

# बीड जिल्ह्यातील अंबाजोगाईसह इतर तालुक्यात कुणबी, एसईबीसी व्हॅलिडीटी सर्टिफिकेट तात्काळ द्या – जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील अंबाजोगाईसह इतर सर्व तालुक्यात कुणबी, एसईबीसी व्हॅलिडीटी सर्टिफिकेट तात्काळ द्यावे अशी मागणी जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी केली आहे. याप्रश्नी त्यांनी उपजिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना बुधवार, दिनांक २१ ऑगस्ट रोजी निवेदन दिले आहे.

राज्याच्या सन्माननीय मुख्यमंत्र्यांना अखिल भारतीय मराठा महासंघाचे वतीने दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई व इतर तालुक्यात मराठा समाजाला शासनाने घोषित



अखिल भारतीय मराठा महासंघाचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

केलेल्या कुणबी व एसईबीसी व्हॅलिडीटी सर्टिफिकेट देण्यासाठी बीड येथील समाजकल्याण कार्यालय, बीड येथील कर्मचारी मुद्दामहून वेळ लावत असल्याचे दिसून येत आहे. याचा फटका सध्या विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये विविध अभ्यासक्रमांना प्रवेश घेताना (ॲडमिशन) व इतर सीईटी, जेईई आणि नीट सारख्या शैक्षणिक परीक्षा व आवश्यक कामांसाठी अनेक अडचणी निर्माण होत आहेत. समाजकल्याण कार्यालय, बीड येथे जाऊन मराठा समाजातील एखाद्या विद्यार्थ्याने विचारणा केली असता समाधानकारक उत्तर मिळत नाही. किंवा मराठा समाजातील असल्याने पुर्वग्रह ठेवून वागणूक दिली जात आहे. राज्य शासनाने एसईबीसी व्हॅलिडीटीला सहा महिन्यांचा अवधी दिला असला तरी विद्यार्थ्यांना लवकरात लवकर व्हॅलिडीटी सर्टिफिकेट मिळावे. यासाठी कर्मचाऱ्यांचे सहकार्य असावे. परंतु, सदरील समाजकल्याण ◀◀ पान ३ वर

# ग्रामरोजगार सेवकाचे पंचायत समिती समोर आमरण उपोषण

## तक्रारी अर्जाची प्रत, गट विकास अधिकारी यांनी केलेली चौकशी, ग्रामपंचायतला पाठवलेल्या अहवालाची प्रतची केली मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील ग्रामपंचायत गोविंदवाडी येथील ग्रामरोजगार सेवक अनंत बन्सीधर जाधवर आपली सेवा बजावत असताना अचानकपणे त्यांना पदमुक्त करण्यात आले. त्यांनी या कारणावरून गटविकास अधिकारी पंचायत समिती माजलगाव यांना दि. ५/७/२०२४ रोजी आपला खुलासा सादर केला होता मात्र त्या अनुषंगाने ग्रामरोजगार सेवक अनंत बन्सीधर जाधवर यांना कुठल्याही प्रकारची नोटीस कार्यालयीन स्तरावरून देण्यात आलेली नसून ग्रामपंचायत ने लेखी व तोंडी स्वरूपात तक्रारी संदर्भात केलेल्या चौकशी अहवालाची माहिती मला न देता व माझ्या विरुद्ध तक्रार संदर्भात कुठलेही ठोस पुरावे नसताना ग्रामपंचायत कार्यालयाने दि.१४/



८/२०२४ रोजी ग्रामसभा बोलवून नवीन रोजगार सेवकाचे अर्ज मागवणे संदर्भात बैठक घेण्यात आली ग्रामपंचायत ने मला पदावरून पदमुक्त केले आहे किंवा नाही या संदर्भात कुठल्याही प्रकारचे लेखि अथवा तोंडी कळवली नाही परस्पर संगणमत करून ग्रामसभा घेण्यात आली.

माझ्याविरुद्ध आलेल्या तक्रारीबाबत ग्रामसेवक, ग्राम विस्तार अधिकारी ,गट विकास अधिकारी ,सहाय्य कार्यक्रमाधिकारी पॅनल तांत्रिक अधिकारी यांनी चौकशी केल्यानंतर तुम्ही ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुण्यातील एमपीएससी आंदोलनात मतभेद? रोहित पवारांच्या उपस्थितीत काही विद्यार्थ्यांचं आंदोलन मागे तर काही जण ठाम

पुणे । प्रतिनिधी

आयबीपीएस परीक्षा आणि एमपीएससीची राज्य सेवा संयुक्त पूर्व परीक्षा या दोन्ही परीक्षा एकाच दिवशी ठेवण्यात आल्याच्या निर्णयाविरोधात पुण्यात एमपीएससीच्या विद्यार्थ्यांकडून आंदोलनाला मोठे यश आले आहे. एमपीएससीच्या गुरुवारीच्या बैठकीत २५ ऑगस्टची परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आज रोजी आयोजित आयोगाच्या बैठकीमध्ये रविवार, दि. २५ ऑगस्ट २०२४ रोजी नियोजित महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, विद्यार्थी आपल्या इतर मागण्यांवर ठाम होते, परिक्षा पुढे ढकलल्यानंतरही ते आंदोलनाला बसले होते. मात्र, पोलिस उपायुक्त संदीप सिंह गील आमदार रोहित पवारांशी चर्चा केली. त्यानंतर आता आमदार रोहित पवारांच्या उपस्थितीत काही विद्यार्थ्यांनी



आंदोलन मागे घेतले असल्याची माहिती आहे. तर काही जण अद्याप आपल्या निर्णयावर ठाम आहेत.

मागील दोन दिवसांपासून सूरु असलेल्या एमपीएससीच्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनानंतर २५ ऑगस्टला होणारी परिक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय एमपीएससीने घेतला. त्याचबरोबर कृषी विभागाच्या २५८ जागांची भरती करण्याचे आश्वासन राज्य सरकारच्यावतीने देण्यात आले. या दोन मागण्या मान्य झाल्यावर आंदोलन करणाऱ्या बहुतांश विद्यार्थ्यांनी आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र संयुक्त पुर्व परिक्षेच्या 'गट ब आणि गट क'च्या पंधरा हजार जागा भरण्याची तिसरी मागणी देखील विद्यार्थ्यांकडून करण्यात येत होती. आता दोन मागण्या मान्य झाल्यावर रोहित पवार, रुपाली पाटील आणि भाजपचे आमदार अभिमन्यू पवार यांनी आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. संयुक्त पुर्व परिक्षेच्या माध्यमातून पंधरा हजार जागा भरण्याच्या तिसऱ्या मागणीबाबत येत्या सात दिवसांत शरद पवार मुख्यमंत्री आणि संबंधित व्यक्तींची भेट घेतील असं आश्वासन रोहित पवारांनी विद्यार्थ्यांना दिलं आहे. त्याचबरोबर भाजपचे आमदार अभिमन्यू पवार यांनी देखील विद्यार्थ्यांशी फोनवरून संवाद साधला आणि या तिसऱ्या मागणीचा पाठपुरावा करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर रोहित पवार, अभिमन्यू पवार यांचे प्रतिनिधी आणि रुपाली पाटील यांनी आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र जोपर्यंत तिसऱ्या संयुक्त पुर्व परिक्षेची मागणी जोपर्यंत मान्य होत नाही तोपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्णय काही विद्यार्थी आणि युवक काँग्रेसच्या काही नेत्यांनी घेतला आहे.

## रक्ताचे नमुने बदलल्याप्रकरणी अग्रवाल पती-पत्नी व डॉक्टरांसह इतरांचा जामीन अर्ज फेटाळला

पुणे - कल्याणीनगर अपघात प्रकरणातील अल्पवयीन मुलाची वैद्यकीय तपासणी करण्यापूर्वी त्याच्या रक्ताचे नमुने बदलून पुरावा नष्ट केल्या प्रकरणात दाखल असलेल्या गुन्ह्यातील सर्व आरोपींचे जामीन अर्ज येथील विशेष न्यायाधीश यू. एम. मुधोळकर यांनी फेटाळले.



या प्रकरणात मुलाचे वडील व बांधकाम व्यावसायिक विशाल सुरेंद्रकुमार अगरवाल, आई शिवानी विशाल अगरवाल (दोघे रा. बंगला क्रमांक एक, ब्रह्मा सनसिटी, वडगाव शेरी), ससूनच्या न्यायवैद्यक विभागाचा प्रमुख डॉ. अजय तावरे, आपत्कालीन विभागाचा मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीहरी हाळनोर, अश्पाक मकानदार आणि अमर गायकवाड येरवडा कारागृहात असून, त्यांनी जामिनासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला होता.


या प्रकरणात दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर आरोपींनी जामिनासाठी अर्ज केला होता. त्या अर्जाला विरोध करत आरोपींनी गुन्हा घडल्याच्या पहिल्याच दिवशी कागदपत्रांसह पुराव्यामध्ये छेड़छाड़ करण्याबरोबरच नवीन पुरावा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. न्यायालयाला योग्य तो निर्णय देण्यासाठी कायद्यानुसार पुरावा लागतो. त्यामुळे न्याययंत्रणेशीच केलेला हा खेळ आहे.

न्याययंत्रणेशी खेळणे हे अतिशय गंभीरतेने घेतले पाहिजे, असा युक्तिवाद विशेष सरकारी वकील शिशिर हिरे यांनी केला होता. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेत आरोपींचा जामीन फेटाळला. अपघातातील कार परत मिळण्यासाठी अग्रवाल कुटुंबीयांनी येथील बाल न्याय मंडळात (जेजेबी) अर्ज केला आहे. या अर्जावर २८ ऑगस्टला पुढील सुनावणी होणार आहे.

# ५०० बिबट्यांचा संचारामुळे शेतकऱ्यांसमोर संकट

जुन्नर । प्रतिनिधी

जुन्नर वनविभागातील आंबेगाव, जुन्नर, शिरूर खेड या चार तालुक्यात जवळपास ५०० बिबटे संचार करत आहेत, अशी माहिती जुन्नरचे उपसंरक्षक अधिकारी अमोल सातपुते यांनी दिली. दिवसा-ढवळे बिबटे वावरत असल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे आहे. शेतात काम करायचे की नाही? असा यश प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे.



प्रामुख्याने जुन्नर तालुक्यातील ओतूर वनक्षेत्र विभाग आणि आंबेगाव तालुक्यातील मंचर वनक्षेत्र विभाग या दोन विभागात बिबट्यांची संख्या आघाडीवर आहे. लहान मुलांना बाहेर खेळायला सोडायचे की नाही असा मोठा गंभीर प्रश्न उभा आहे. याकडे सरकारने लवकर लक्ष देणे गरजेचे आहे. पकडलेले बिबटे जंगलात सोडतात ते पुन्हा येतात. ही साखळी कुठेतरी थांबली पाहिजे. यासाठी सरकारने बिबट निवारा केंद्राची मर्यादा वाढवणे गरजेचे आहे. माणिकडोह बिबट निवारा केंद्र बिबट्यांनी हाऊसफुल्ल झाले असून, मनुष्यावर हल्ले करण्यात आलेले बिबटेच याठिकाणी ठेवण्यात आले आहे.सर्वाधिक बिबट्यांचा वावर जुन्नर तालुक्यातील ओतूर आणि आंबेगाव तालुक्यातील मंचर वनक्षेत्र परिसरात आहे. या भागात पिंजरे लाऊन बिबटे जेरबंद होण्याची संख्या पण अधिक आहे. या पकडलेल्या बिबट्यांना निवारा केंद्रात जागा शिल्लक नसल्याने त्यांना जंगलात सोडले जातात परंतु त्यांना त्या भागात पाणी आणि भक्ष्याचा तुटवडा पडला की ते पुन्हा उसाच्या आश्रयाला येतात ही साखळी तुटणे गरजेचे असून बिबटे निवारण क्षमता वाढवण्याची गरज आहे.

### केंद्राची क्षमता वाढविण्यासाठी प्रस्ताव

माणिकडोह बिबट निवारा केंद्राची क्षमता १५० पर्यंत क्षमता वाढ करण्यासाठीचा प्रस्ताव वनविभागाने केंद्राकडे पाठवला आहे पण मुख्य म्हणजे बिबट्यांची संख्या आहे ५०० ही दुप्पट कधी होईल सांगता येणार नाही. त्यामुळे जुन्नर तालुक्यात माणिकडोह निवारा केंद्राप्रमाणे नवीन बिबट सफारी लवकरात लवकर होणे गरजेचे आहे आणि पकडलेला प्रत्येक बिबट्या त्या बिबट निवारा केंद्रात गेलाच पाहिजे तरच शेतकरी चार घास आपल्या शेतात बसून खाऊ शकेल, असे वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

## डोक्यात झाडाची फांदी पडून तरुण जखमी

पुणे : जंगली महाराज रस्त्यावर झाडाची फांदी डोक्यात पडून तरुण गंभीर जखमी झाल्याची घटना बुधवारी सायंकाळी घडली. जखमी झालेल्या तरुणावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.


आदित्य शिवाजी सौदागर (वय २३) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आदित्य हा जंगली महाराज रस्त्यावरील छत्रपती संभाजी उद्यानासमोर असलेल्या पीएमपी थांब्यावर बुधवारी सायंकाळी थांबला होता. त्यावेळी अचानक झाडाची फांदी त्याच्या डोक्यात पडली. गंभीर जखमी झाल्याने त्याला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

वर्षभरापूर्वी शनिवार पेठेतील ओंकारेश्वर मंदिराजवळ थांबलेल्या अभिजीत गुंड या तरुणाच्या डोक्यात फांदी पडून त्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. जंगली महाराज रस्त्यावर झाडाची फांदी दुचाकीस्वार महिलेच्या अंगावर कोसळल्याची घटना फेब्रुवारी महिन्यात घडली होती. बिबवेवाडी भागात झाडाची फांदी डोक्यात एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती.

# गुंतवणुकीवर चांगल्या परताव्याचे आमिष दाखवून संगणक अभियंत्याची एक कोटींची फसवणूक

पुणे । प्रतिनिधी

शेअर बाजारात गुंतवणुकीवर चांगला परताव्याचे आमिष दाखवून फसवणुकीच्या घटना वाढत आहेत. सायबर चोरट्यांनी धायरीतील एका संगणक अभियंत्याची एक कोटी १५ लाख रुपयांची फसवणूक केली. तर, मगरपट्ट्यातील एका तरुणाला सुमारे २५ लाख रुपयांना गंडा घातला.



धायरीतील घटनेबाबत एका ४५ वर्षीय व्यक्तीने सायबर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध माहिती-तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सायबर चोरट्यांनी धायरीतील एका संगणक अभियंत्याच्या मोबाईलवर ३० जून रोजी लिंक पाठवली.

संगणक अभियंत्याने लिंकवर क्लिक केल्यानंतर त्यांना व्हॉटसप ग्रुपमध्ये सहभागी करून घेण्यात आले. ग्रुप डमिन रजत चोप्राने त्यांना शेअर बाजारातील गुंतवणुकीबाबत माहिती दिली. त्यानंतर मोबाईलवर प डाऊनलोड करण्यास सांगितले. त्या पद्वारे संगणक अभियंत्याने वेळोवेळी आरोपींच्या बँक खात्यात एक कोटी १५ लाख रुपये जमा केले. परंतु आरोपींनी त्यांना गुंतवणुकीवर परतावा दिला नाही. याबाबत अभियंत्याने सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पुढील तपास सायबर गुन्हे शाखेच्या पोलिस निरीक्षक स्वप्नाली शिंदे करीत आहेत.

# शहरातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन

पुणे- डब्ल्यू आर आय इंडिया व पुणे महानगरपालिका पर्यावरण विभागामार्फत शहरातील विकासक डेव्हलपर ,साईट इंजिनिअर तसेच पीएमआरडीए क्षेत्रातील विविध शासकीय कार्यालयातील अभियंते यांच्यासाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते .

पुणे महानगरपालिकेच्या पंडित जवाहरलाल नेहरू अडोटिरीम घोले रोड येथे या कार्यशाळेचे आयोजन आज दिनांक २२ ऑगस्ट २०२४ रोजी करण्यात आले होते . या कार्यक्रमाला पुणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बीपी,पर्यावरण विभागाचे उपायुक्त संजय शिंदे, पर्यावरण संवर्धन अधिकारी मंगेश दिघे,क्रीडाई पुणे चे अध्यक्ष नाईक नवरे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त नगर अभियंता संजय कुलकर्णी, डब्ल्यू आर आय इंडिया डायरेक्टर कुमार स्वामी ,व्याख्याते व इंजिनिअर संदीप नारायण, शहरातील विकासक व अभियंते उपस्थित होते.

केंद्र सरकारच्या पंधराव्या वित्त आयोग अंतर्गत नॅशनल क्लीन एअर प्रोग्राम या कार्यक्रमांतर्गत शहरातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी केंद्र शासनाकडून




पुणे महापालिकेला आतापर्यंत १६२ कोटी रुपये मिळाले असून पुढील दोन वर्षात साधारणतः अजून १३९ कोटी रुपये प्राप्त होणार आहेत. प्राप्त होणाऱ्या निधीतून विविध विभागामार्फत शहरातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी विकास कामे केले जाणार आहेत.त्या कार्यक्रमाचाच एक भाग म्हणून यांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेमध्ये शहरांमध्ये खाजगी विकासा मार्फत जे विविध प्रकल्प सुरू आहेत तसेच मेट्रो प्रकल्प पुणे महापालिकेच्या वतीने सुरू असलेले विविध विकास कामे हे कामे करीत असताना त्या कामाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणामध्ये धूळ तयार होऊन ती हवेमध्ये मिक्स होते व त्यामुळे हवेची गुणवत्ता बिघडते यावर उपाययोजना करण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन केले होते. यामध्ये अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बीपी यांनी कार्यशाळेला मार्गदर्शन करताना पुणे शहराची हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी व प्रदूषण कमी करण्यासाठी आवश्यकता उपाय योजना महापालिकेच्या वतीने सुरू असून त्यामध्ये विकासक डेव्हलपर यांचे सहकार्य अत्यंत आवश्यक असल्याचे नमूद केले आहे . त्यांनी पुढील पाच वर्षांमध्ये केंद्र सरकारकडून प्राप्त झालेल्या निधीतून हवेची गुणवत्ता सुधारत असताना पी एम टेन ची पातळी कमी करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. पुणे शहर हे निसर्गसौंदर्याने नटलेले असून या शहरातील नागरिकांना चांगली हवा उपलब्ध व्हावी यासाठी सर्वांनीच एकत्रित येऊन प्रयत्न करणं आवश्यक असल्याचे ते म्हणाले. यावेळी क्रीडाई संचालक नाईक नवरे म्हणाले महापालिकेच्या वतीने सुरू असलेल्या विविध उपाय योजनांमध्ये विकासाचा सक्रिय सहभाग राहणार असून महापालिकेने नमूद केलेल्या सर्व बाबीचे नियमाचे पालन होणार आहे. याबाबत बिल्डर असोसिएशनची मीटिंग घेऊन त्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. कार्यक्रम आयोजन केल्याबद्दल डब्ल्यू आर आय इंडिया आणि पुणे महानगरपालिका यांचे नवरे यांनी अभिनंदन केले . डब्ल्यू आर आय इंडियाचे संचालक कुमार स्वामी यांनी धुळीच्या कणामुळे हवेमध्ये जे प्रदूषण निर्माण होते त्यावर उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने विकासाक इंजिनियर्सना प्रेझेंटेशनच्या माध्यमातून सांगितले.सेंट्रल पोल्युशन कंट्रोल बोर्ड व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडून प्राप्त होणारे विविध आदेश आणि त्या त्याची अंमलबजावणी करण्याबाबत उपस्थितांना त्यांनी यावेळी मार्गदर्शन केले.

# कठोर परिश्रमाची तयारी असल्यास यश मिळतेच

पुणे । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी स्वतःचे गुरू स्वतःच बनून निर्णयक्षमता वाढवावी. प्रामाणिक हेतू व कठोर परिश्रमाची तयारी असल्याच यश नक्कीच मिळते, असे मत सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याणमंत्री व जेएसपीएम ग्रुप ऑफ इन्स्टिटट्यूशन्सचे संस्थापक सचिव प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी व्यक्त केले आहे. जेएसपीएम विद्यापीठात उगम - २०२४ या दुसऱ्या इंडक्शन कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.




याप्रसंगी ते बोलत होते. या वेळी विद्यापीठाचे अध्यक्ष डॉ. रवी जोशी, कुलगुरू प्रा. बी. बी. आहुजा, डॉ. अजित थेटे, विशाल चौधरी, डॉ. महेश बुरांडे, डॉ. अनुराधा देशपांडे, डॉ. आर. एस. देशपांडे, डॉ. प्रभासिंग शर्मा, डॉ. सागर वानखेडे, अर्पिता कासवा, डॉ. दत्तात्रय भिसे आदी उपस्थित होते.

व्यावसायिक प्रोत्साहन व रोजगार निर्मिती हे जेएसपीएमचे उद्दिष्ट असून, सामान्य चौकट मोडून स्वतःचा विकास, स्वअध्ययन, स्वनिर्मिती झाली पाहिजे. सेल्फ लर्निंग लॅब ही संकल्पना आयआयटीच्या धर्तीवर अंमलात आणणार आहे. शैक्षणिक दर्जा वाढविणे व सुसंस्कृत युवा पिढी तयार करून देशाच्या सामाजिक प्रगतीत योगदान देणे गरजेचे बनले आहे. पुढील शैक्षणिक वर्षात वैद्यकीय महाविद्यालय सुरू करणार असल्याचेही प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी सांगितले. एकाच संकुलात विविध अभ्यासक्रम उपलब्ध असल्यामुळे विद्यार्थी अनेक विषयांत पारंगत असतील व इंटरडिसिप्लिनरी धोरणामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होईल, असेही त्यांनी नमूद केले आहे.

## प्रलंबित कर्जाची परतफेड न केल्यामुळे बंद असलेली महिलांची बँक खाती सुरू करा; महापालिकेचे बँकांना आवाहन

पुणे : मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या अंतर्गत हस्तांतरित करण्यात आलेली आर्थिक लाभाची रक्कम कोणत्याही थकीत कर्जाच्या बदल्यात समायोजित करण्यात येऊ नये, तसेच आधार कार्ड बँकेशी संलग्न नसल्यास विशेष मोहीम राबवून यासंदर्भात कामकाज लवकरात लवकर पूर्ण करावे, आणि लाभार्थ्यांचे प्रलंबित कर्जाची परतफेड न केल्यामुळे बंद असलेले बँक खाते तत्काळ सुरु करण्यात यावे असे आवाहन अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी बँकेच्या अधिकाऱ्यांना केले.



मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या अनुषंगाने जुलै आणि ऑगस्ट २०२४ महिन्याची एकत्रित रक्कम लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे. त्यानुसार लाभार्थी महिलांच्या खात्यात ३ हजार रुपये जमा झाले आहे. परंतु काही लाभार्थी महिलांच्या खात्यात अद्यापही ही रक्कम जमा झालेली नाही. याबाबत तात्काळ अंमलबजावणी करण्यासाठी आज जिल्हा मध्यवर्ती बँकेसमवेत बैठक घेण्यात आली, यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.यावेळी समाज विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे तसेच इंडसइंड बँक, इंडियन ओव्हरसीज बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, युनियन बँक ऑफ इंडिया, कोटक महिंद्रा बँक, ॲक्सिस बँक, कॅनरा बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया, आयडीबीआय बँक, आयसीआयसीआय बँक, एचडीएफसी, बँक ऑफ इंडिया, एलडीएम आदी बँकेचे व्यवस्थापक आणि प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून बँकेशी आधार संलग्न ( आधार सीडेड) नसलेल्या लाभार्थी महिलांची यादी बँक निहाय शेअर करण्यात आली आहे. बँकेशी आधार संलग्न नसल्यामुळे बऱ्याच लाभार्थी महिलांच्या खात्यात लाभाची रक्कम जमा झालेली नाही, अशा महिलांना संपर्क करून उर्वरित कामकाज पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी महापालिकेच्या वतीने विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात येणार आहे. जेणेकरून या मोहिमेच्या माध्यमातून बँकेशी आधार संलग्न करण्याचे कामकाज पूर्ण करण्यात येईल.

# समस्या सोडवण्याचे सांगत पुजाऱ्याचा डल्ला

**अमेरिका येथे शिक्षण घेत असलेल्या पुण्यातील विद्यार्थिनीला तब्बल १८ लाख ५५ हजार रुपयांना फसवले**

पुणे । प्रतिनिधी

शिक्षण आणि घरातील समस्या सोडविण्यासाठी पूजापाठ करण्याचे सांगत पिंपरी-चिंचवड येथील पुजाऱ्याने शिकागो (अमेरिका) येथे शिक्षण घेत असलेल्या पुण्यातील विद्यार्थिनीला तब्बल १८ लाख ५५ हजार रुपयांना फसवल्याचे समोर आले आहे. इतकेच नव्हे, तर तिला पालकांच्या परस्पर पुण्यात बोलावून दागिने आणि अमेरिकेतून आणलेले महागडे कपडेही काढून घेतले.

या प्रकरणी प्रभात रस्ता येथील २१ वर्षीय तरुणीने डेक्कन पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार सिद्धार्थ अभयकुमार आमळे (रा. काळेवाडी, पिंपरी-चिंचवड) या पुजाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित तरुणी शिकागो येथे सिव्हिल इंजिनिअरिंग शिकते. तिच्या आईने फोन करुन तिला आमळे याचा नंबर दिला.

तसेच काही अडचणी असतील तर कॉल करण्यास सांगितले. त्यानुसार तिने शिक्षण आणि आई-वडिलांच्या भांडणाबद्दल आमळे याला माहिती दिली. तेव्हा त्याने आयुष्यातील समस्या अध्यात्म, पूजापाठ आणि जप करुन सोडवतो' असे सांगितले. मात्र, अशा गोष्टींवर विश्वास नसल्याने तिने पूजापाठ करण्यास नकार दिला.

मात्र, त्यानंतरही आमळे हा तिला सतत फोन करुन पूजापाठ केल्याशिवाय तुझ्या आयुष्यातील समस्या संपणार नाही, यासाठी काही पैसे लागतील ते मी परत देईन,' असे सांगून सातत्याने त्रास देऊ लागला.

तसेच पूजा होईपर्यंत अगदी आईलाही सांगू नको. नाही तर फळ मिळणार नाही' असे सांगितले. या प्रकारे पुजाऱ्याने तिच्याकडून वेळोवेळी ११ लाख ८३ हजार रुपये ऑनलाइन घेतले. यानंतर पीडितेने गुण येत नसल्याचा फोन केला असता, पुजाऱ्याने लवकरच सर्व ठीक होईल, असे आश्वासन दिले.

पीडित पुण्यात येणार असल्याचे तिने कळवले असता, पैसे दिल्याबद्दल घरच्यांना सांगू नकोस. तसेच पुण्यात येणार असल्याचेही कळवू नकोस,' असे पुजाऱ्याने सांगितले. शिवाय, पीडित पुण्यात आल्यावर तिला पुणे विमानळावर घेण्यास स्वतः आमळे हा गेला. तिला कर्वेनगर येथे आणून कोऱ्या कागदावर आणि एका डायरीवर सह्या घेतल्या. आमळे याच्या सांगण्यावरून तिने दोन-तीन नवीन सिमकार्डही घेतले. महागडे कपडे असलेली बॅगही आमळे याने मुलीकडून काढून घेतली. यानंतर नवीन नंबरवर तिला फोन करून हा पुजारी सतत पैशांसाठी तगादा लावत होता. आमळे याने तिला चिंचवड येथील एका मॉलमध्ये बोलावून घेतले होते. पुजाऱ्याच्या तगाद्याला वैतागून पीडितेने मार्चमध्ये सोन्याचा हार, बांगड्या आणि २ लाख ८७ हजारांची रोकड या पुजाऱ्याला दिली. काही दिवसांनी पीडितेने पैसे परत मागितले असता, आमळे याने फोटो मॉर्फ करुन सोशल मीडियावर टाकून बदनामी करेल,' अशी धमकी दिली. तसेच अमेरिकेतून पाठवलेल्या पैशांबाबत कोणास सांगितल्यास दमही भरला. यानंतर ते सातत्याने मोबाइल, हिऱ्याची अंगठी आणि सोन्याचे पेंडल मागत होते.

### तरुणी गेली होती नैराश्यात

या सर्व प्रकाराने तरुणी नैराश्यात गेली होती. ती सतत गप्प-गप्प रहात होती. एके दिवशी आजोबांनी विश्वासात घेतल्यावर तिने हा प्रकार सांगितला. यानंतर आजोबांच्या सल्ल्याने तिने आमळे याच्याविरुद्ध डेक्कन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली